मंगळवार, 24 मे 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी · दैनिक
वर्ष - 01 · अंक - 264
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • TUESDAY 24 MAY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-01 • ISSUE-264 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-10 • PRICE-5

# लोकांना मूर्ख बनवणाऱ्यांना ही नौटंकीच वाटेल

## औरंगाबादेतील जल आक्रोश मोर्चात देवेंद्र फडणवीसांचा घणाघाती आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद : ज्यांनी जीवनात काहीच केले नाही, केवळ लोकांना मूर्ख बनवले त्यांना ही नौटंकीच वाटेल, ज्यांनी जनतेसाठी संघर्षच केला नाही, ते तिथे बसून जे करताहेत ती नौटंकी आहे, अशा शब्दात विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी संताप व्यक्त केला आहे. पाण्याच्या समस्येसाठी भाजपकडून सोमवारी औरंगाबादेत महाविकास आघीडीविरोधात जल आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या जल आक्रोश मोर्चात हजारोंच्या संख्येने कार्यकर्त्यांसह महिला रिकामे हंडे घेऊन सहभागी झाल्या होत्या.**

यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेवर जोरदार टीका करताना म्हटले की, सतत इतके वर्ष सातत्याने महानगर पालिकेची सत्ता गाजवूनही औरंगाबादेत पाण्याचा जो सत्यानाश शिवसेनेच्या नेतृत्त्वात झाला, त्याची फळे औरंगाबादची लोक भोगत आहेत. इथे पाणीच नाही. इतक्या मोठ्या प्रमाणात लोकांना त्रास सहन करावा लागतो. मी मुख्यमंत्री असताना जी योजना मंजूर केली आणि १६०० कोटी रुपये दिले. त्या योजनेत बदल करुन ६०० कोटी महापालिकेने द्यावे, असा निर्णय या सरकारने केला. इथे महापालिकेकडे पगार द्यायला पैसे नाहीत, अशी परिस्थिती आहे, अशी टीका फडणवीसांनी केली आहे.

केंद्र सरकारने दिलेले पैसेच या योजनेत वळवले आहेत. योजनेचा ठेकेदार कामही करत नाही. अर्धा किलोमीटरही काम झालेले नाही. ४० किलोमीटर काम करायचे आहे. ज्या वेगाने काम चालले त्या वेगाने २५ वर्ष लागतील, त्यामुळे भाजपच्या वतीने जल आक्रोश मोर्चा काढत आहोत, प्रचंड प्रतिसाद त्याला आहे, पाण्याची समस्या सुटेपर्यंत भाजपचा संघर्ष सुरू राहणार, असेही त्यांनी सांगितले. नाना पटोले हे रोज खोटे बोलतात. मनाला येईल ते बोलतात त्यामुळे अशा व्यक्तीला उत्तर देण्याचे कारण नाही. २४/७ पाणी पुरवठ्याचा अवॉर्ड नागपूरला मिळाला. हे नाना पटोलेंना माहिती नाही, असे म्हणत त्यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंवर टीका केली.

ज्या प्रकारे नागरिकांना महाविकास आघाडी सरकारने आणि महापालिकेतील शिवसेनेने फक्त आश्वासने दिली, भावनेचे राजकारण केले, पण, थेंबभर पाणी दिले नाही, हा आक्रोश औरंगाबादच्या जनतेचा आहे, सरकारला याचा सामना करावाच लागेल, औरंगाबादला पाणी मिळाल्याशिवाय आमचा जनआक्रोश, संघर्ष संपणार नाही. हा आक्रोश भाजपचा नाही तर औरंगाबादच्या जनतेचा मोर्चा, पाणी मिळाल्याशिवाय संघर्ष थांबणार नाही. यांची आश्वासने फोल आहे, ते किती भ्रष्टाचारी आहेत हे लोकांना कळले. मागच्या काळात याच मार्गाने गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्त्वात मोर्चा काढून सत्ताबदल केला होता, त्याच मार्गावर आम्ही पुन्हा चाललो आहे, सत्ता नाही तर व्यवस्था बदलाकरिता मोर्चा, सत्ता बदल जेव्हा करायचे तेव्हा करू, सध्या भ्रष्टाचाऱ्यांची भ्रष्ट व्यवस्था बदलून सामान्य माणसाला पाणी द्यायचे आहे, असे शेवटी देवेंद्र फडणवीस म्हणाले.




### हा जन आक्रोश मोर्चा आहे, जनतेचा हा असंतोष आहे : रावसाहेब दानवे

**मोर्चा जरी भाजपने काढला असला तरी या मोर्चात सहभागी झालेले जे लोक आहेत औरंगाबादवासी आहेत, हा जन आक्रोश मोर्चा आहे, जनतेचा हा असंतोष आहे, जे राज्यकर्ते आहेत त्यांच्याविरोधात हा मोर्चा आहे, या मोर्चाची दखल घेऊन राज्य सरकारने फडणवीसांच्या काळात १६८० कोटी रुपयांची योजना मंजूर झाली होती, तिला त्वरीत मान्यता देऊन कामाला सुरूवात करावी, असे केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे म्हणाले.**

# वाघडोहने घेतला शेवटचा श्वास

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील जगप्रसिध्द 'वाघडोह' वाघाचा मृत्यू झाला. चंद्रपूर शहराजवळ असलेल्या सिन्हाळा गावाशेजारी असलेल्या जंगलात आज सकाळी त्याचा मृतदेह आढळून आला. अंदाजे 17 वर्ष वय असलेल्या या वाघाने जवळजवळ सात ते आठ वर्ष ताडोबा व्याघ्र प्रकल्पात स्वतः चे अधिराज्य गाजवले.

ताडोबाच्या मोहर्ली, खातोडा आणि तेलिया च्या विशाल भूभागावर 'वाघडोह'चा एकछत्री अंमल होता. वाघडोह हा वाघ त्याच्या चेहऱ्यावर असलेल्या जखमेच्या खुणेमुळे 'SCARE FACE' या नावाने आणि 'BIG DADDY OF TADOBA' म्हणून देखील प्रसिध्द होता. वाघडोह हा ताडोबातील किमान 40 पिल्लांचा पिता होता. 40 पेक्षा जास्त पिलांचा पिता, अतिशय मोठा आकार आणि नेहमी कुटुंबासोबत राहत असलेल्या या कुटुंबवत्सल वाघाला त्यामुळेच "BIG DADDY OF TADOBA" हे नाव पडले होते. ताडोबा ला जागतिक कीर्ती मिळवून देण्यात वाघडोहचा सिंहाचा वाटा होता. म्हातारा आणि अशक्त झाल्यामुळे 'वाघडोह' ला तीन वर्ष



आधी इतर वाघांनी ताडोबातून हुसकावून लावले होते आणि तेव्हा पासून त्याचा चंद्रपूर शहराजवळील जंगलात वावर होता. वय वाढल्याने शिकार करण्यावर मर्यादा आल्या होत्या. त्यामुळे गावाशेजारी वास्तव्य करून सहज मिळणारी शिकार करून तो जगत होता. अशातच त्याचा आज मृत्यू झाला. वाघडोहच्या मृत्यू मुळे वन्यजीवप्रेमी अतिशय व्यथित झाले असून त्याला सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात श्रध्दांजली वाहण्यात येत आहे. आज सिनाळा जंगलात त्याचा मृतदेह आढळून आला. त्याचे सर्व अवयव शाबूत असून, एक दीर्घकाळ जगलेला वाघ मृत्युमुखी पडल्याने वन्यजीवप्रेमी व्यथित झाले आहेत.

# सोयाबिन, मोहरी, शेंगदाणा, पामोलिनच्या दरात कपात

आधुनिक केसरी न्यूज

नवी दिल्ली : गेल्या अनेक महिन्यांनंतर आत देशांतर्गत बाजारात मोहरी, शेंगदाणा, सोयाबिन, पामोलिनसह सर्व खाद्यतेलाच्या किमतीत घसरण होताना दिसते आहे. परंतु परदेशात तेलाच्या किमती अद्यापही कमी झालेल्या नाहीत. देशांतर्गत बाजारात सोयाबिन, मोहरी, शेंगदाणा, पामोलिन यासह अनेक खाद्यतेलाच्या दरात प्रतिलीटर 7 ते 10 रुपयांची घसरण झाली आहे. जाणकारांनुसार, इंडोनेशियाने निर्यात उघडल्यानंतर ही घसरण झाली आहे. सोयाबीन आणि पामोलिन तेलाच्या किमती जवळपास 100 डॉलरने कमी झाल्या आहेत. पण परदेशात अद्यापही सूर्यफूल तेलाच्या किमती वाढलेल्याच आहेत.

भारतात देशांतर्गत बाजारातील महागाईमुळे सर्वसामान्यांच्या घरातील बजेट कोलमडले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च तेल, गॅस आणि इतर वस्तूंच्या किमतीत सातत्याने वाढ होत आहे. पण वाढत्या महागाईत मोदी सरकारने काही दिलासा दिला. नुकताच इंडोनेशिय सरकारने 23 मेपासून पाम तेलाच्या निर्यातीवरील बंदी हटवण्याची घोषणा केली. त्याचाच परिणाम खाद्य तेलाच्या किमतीवर पाहायला मिळतो आहे.

### तेलाच्या किमतीत वाढ का झाली?

गेल्या काही महिन्यांपासून परदेशात खाद्यतेल महाग झाल्याने आयात कमी झाली होती. त्याचा परिणाम भारतातील किमतीवर झाला. परंतु आता स्थानिक मागणी सोयाबीन, भुईमूग, कापूस आमि मोहरीने भागवली जात आहे. तसंच इंडोनेशियाने तेलाच्या किमती सुमारे 100 डॉलरने कमी केल्या आहेत. यातून आयातही सुरू झाली आहे. येत्या काही दिवसांत इंडोनेशियातून तेलाची आवक झाल्यानंतर खाद्यतेलाच्या किमती आणखी घसरण्याची शक्यता आहे.

# "पारो" च्या स्मृतिदिनाचा विविध संघटनांना चक्क विसर

## पारोचा 166 वा स्मृतीदिन विशेष

आधुनिक केसरी न्यूज


संदीप मानकर

अजिंठा : अजिंठ्यातील ऐतिहासिक आणि तितकाच प्रतिभाशाली व गौरवशाली इतिहास असलेल्या "पारो" चा 23 मे रोज स्मृतिदिन... या स्मृतिदिनाचा विविध संघटनांना चक्क विसरच पडलेला दिसून आला. काही वर्षांपूर्वी पारो च्या जीवनांवर आधारीत अजिंठा चित्रपट प्रदर्शित झाला. यावेळी सदरील चित्रपटाचे दिग्दर्शक आणि टीम अजिंठा येथील पारो च्या समाधीस्थळांवर चित्रीकरणासाठी आले असताना विविध समाजातील संघटनांनी पारो आमच्या समाजाची आहे असा दावा केला व एवढेच नव्हे तर वेगवेगळ्या पद्धतीचे आंदोलने केली. तिच्या जातीविषयी अनेक विवाद झाले. पारोच्या समाधीची दुरावस्था दूर करण्यासाठी अनेक संघटनांनी पुढाकार घेतला. मात्र आज 23 मे पारो च्या स्मृतिदिनी या संघटनांना पारो चा चक्क विसरच पडलेला दिसून आला आहे. पारोच्या समाधीस्थळाजवळ



असलेला कचरा, दुर्गंधी व याचबरोबर संघटना, स्थानिक प्रशासन व राज्य पुरातत्व विभाग या सर्वांच्या विसराळूपणामुळे आज हे जागतिक दर्जाचे ऐतिहासिक ठिकाण "समृद्ध इतिहासातील अडगळीत पारो" म्हणायला अजिबात वावगे ठरणार नाही. अजिंठ्याच्या डोंगररांगात 18 व्या शतकात बहरली ती पारो आणि रॉबर्ट गिल यांची प्रेमकथा. 1844 नंतर अजिंठा लेण्यांचा सांकृतिक वारसा पुन्हा जगासमोर आणणारा जगविख्यात प्रतिभावंत कलावंत चित्रकार मेजर रॉबर्ट गिल व आदिवासी तरुणी पारो यांची प्रेमकथा ही धर्म, देश, प्रांत, जात, संस्कृती, भाषा यांच्या सीमा ओलांडणारी प्रेमकथा ठरली व या प्रेमकथेचा सहवास 12 वर्षांचा ठरला. पारोच्या मृत्यू नंतर रॉबर्ट गिल याने अजिंठा गावाच्या दक्षिणेकडील दिल्ली गेट जवळ तिचं लहानसं सुंदर असं स्मारक उभारलं त्या स्मारकाच्या संगमरवरावर "टू द मेमरी ऑफ माय बिलव्हड पारो व्हू डाईड" 23 मे 1856" अशा दोन ओळी लिहून कृतज्ञतेची भावना व्यक्त केली आहे. 23 मे आज तिचा 166 वा स्मृतीदिन. मात्र आज देखील हे स्मारक अस्वच्छतेने वेढलेले होते. जागतिक वारसा असलेल्या लेण्यांचा समृध्द इतिहास असलेल्या अजिंठा गावात पारो मात्र आज देखील अडगळीत पडली आहे.

वरील शोकांतिका व खेदजनक बाब लक्षात घेऊन अजिंठ्यातील तरुणांनी पुढाकार घेऊन आज पारो च्या स्मृतीस्थळावर जाऊन साफसफाई केली व स्मृतिदिनानिमीत्त आदरांजली वाहिली. याप्रसंगी अजिंठा पोलीस ठाण्याचे हेडकॉन्स्टेबल बाबा चव्हाण, करणी सेनेचे प्रदेशाध्यक्ष अरुण चव्हाण, स्थानिक इतिहास संशोधक विजय पगारे, दिपक चव्हाण, सुरज रुणवाल, कौतिक चव्हाण, डॉ.संजय ब्राम्हंदे, निलेश पवार, किशोर चव्हाण, निखिल माहोर, सौरभ माहोर, कन्हैया परिहार, मयूर दसरे, रितेश ढाकरे, ज्ञानेश्वर दांडगे आदींची उपस्थिती होती.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# देखो रुठा ना करो ...

आधुनिक केसरी

वपु काळेंची एक ‘ पंतवैद्य ‘ नावाची कथा आहे. आता सविस्तर आठवत नाही. पण या कथेतला जो नवरा असतो तो थोडा भोळा, बावळट वगैरे दाखवला आहे. त्याची बायको मात्र स्मार्ट असते. तीन मुले, आपला संसार आणि नवरा मोठ्या हुशारीने ती सांभाळते. एकदा वपु त्या माणसाला म्हणतात, ‘ तुम्ही असे वागतात म्हणूनच लोक तुम्हाला बाहेर बावळट म्हणतात. घरात काय परिस्थिती आहे ? तेव्हा तो माणूस उत्तरतो. मी तिला विचारतो, तुला काय हवे ? ‘ ती म्हणते, ‘ सत्ता. ‘ मग ती मला विचारते, ‘ तुम्हाला काय हवे आहे ? ‘ मी सांगतो, ‘ शांतता ‘ झाले तर मग. तिला हवी ती सत्ता मी देऊन टाकतो आणि मला हवी ती शांतता मला मिळते...! किती बोलकी आहे ही कथा !

लेखात मी काही गमतीदार उदाहरणे दिली असली तरी दोन घटका करमणूक व्हावी म्हणून! प्रत्यक्षात संसार म्हटला की तडजोड दोघांना करावी लागते कारण संसार दोघांचा असतो. एक जण चुकला तर दुसऱ्याने सांभाळून घ्यायचे असते. कधी कधी पत्नी तिच्या जागी बरोबर असते तर कधी कधी पती सुद्धा...! पण दोघांनीही मीच बरोबर असे म्हटले तर वाद निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहीत. या ठिकाणी संत कबीरांची वाचलेली एक गोष्ट मला आठवते. ती सांगून मी या लेखाचा शेवट करतो.

कबीरांकडे अनेक लोक आपल्या समस्या घेऊन येत असत. एकदा आपल्या पत्नीच्या भांडणामुळे अशीच त्रस्त झालेली एक व्यक्ती त्यांच्याकडे येते. आपली पत्नी आपले अजिबात ऐकत नाही असे सांगून तो माणूस कबीरांना आपल्या समस्येवर तात्काळ काही उपाय सांगा म्हणून विनंती करतो. कबीर शांतपणे त्या माणसाचे ऐकून घेतात. ते आपल्या मुलाला बोलावतात. त्याला म्हणतात, ‘ बेटा, तुझ्या अम्मीकडे जा आणि तिला सांग की अब्बूनी कंदील लावून मागितला आहे. ‘ तो मुलगा घरात जातो आणि लावलेला कंदील बाहेर घेऊन येतो. कबीर तो कंदील त्या दोघांच्या मध्ये ठेवतात. आता भर दुपारी त्या कंदिलाचे काय काम असा प्रश्न त्या गृहस्थाला पडतो. पण कबीरांचा काही उद्देश असेल असे वाटून तो गप्प बसतो. आता कबीर आपल्या बायकोला हाक मारून म्हणतात, ‘ अरी, सुनती हो ? हमारे घर मेहमान आये हैं. उनके लिये दूध का कुछ प्रबंध करो.’ ‘जी, अभी लायी, ‘ असं म्हणून कबीरांची बायको घरात जाते. थोड्या वेळाने दुधाने भरलेले दोन ग्लास घेऊन येते. कबीर ग्लास तोंडाला लावल्याबरोबर सारे दूध एका झटक्यात पिऊन टाकतात. तो गृहस्थ मात्र एकच घोट पिल्याबरोबर तोंड वेडेवाकडे करतो. तेव्हा कबीर त्याला विचारतात, ‘ कुछ समझे भाई ? ‘ तेव्हा तो गृहस्थ नकारार्थी मान हलवतो. मग कबीर म्हणतात, ‘ भल्या गृहस्था, मघाशी मी कंदील लावून मागितला. पण माझ्या बायकोने मला काही एक न विचारता कंदील लावून आणून दिला. भर दुपारी कंदील कशाला हवा आहे असं तिनं विचारलं नाही. आता नुकतंच तिनं दूध आणून दिलं. एकवेळ दुधात साखर टाकली नसती तरी चाललं असतं. पण दुधात तिच्या हातून चुकून मीठ पडलं. पण हे मी समजून घेतलं. काही न बोलता दूध पिऊन घेतलं. ठरवलं असतं तर आताच तुझ्यासमोर आमची भांडणं झाली असती. पण असं करायचं नसतो. संसार हा दोघांच्या विश्वासावर उभा असतो. दोघांनी एकमेकांना समजून घ्यायचं असतं. हे ऐकल्यावर तो गृहस्थ समाधानाने परतला. ही कथा आपल्याला खूप काही सांगून जाते.



## आनंदी पहाट

# शिक्षण बदलाचा शक्तिशाली घटक

आधुनिक केसरी

शाळा त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये काही प्राधान्य मूल्ये आणि दृष्टीकोनांचे पालनपोषण करून मूल्यशिक्षणाचा प्रचार करत असतात, उदा. “चिकाटी”, “इतरांचा आदर”, “जबाबदारी”, “राष्ट्रीय ओळख”, “बांधिलकी”, “अखंडता”, “इतरांची काळजी”, “कायद्याचे पालन”, “सहानुभूती” आणि “परिश्रम”. शिक्षण ही जगातील सर्वात सक्षम शक्ती आहे; त्यातून ज्ञान निर्माण होते, आत्मविश्वास निर्माण होतो आणि संधीतील अडथळे दूर होतात. मुलांसाठी, चांगल्या जीवनाचे दरवाजे उघडणे ही त्यांची गुरुकिल्ली असते. शिक्षण हे बदलाचे एक शक्तिशाली घटक आहे आणि आरोग्य, उपजीविका सुधारण्यासाठी, सामाजिक स्थिरतेला हातभार लावण्यासाठी आणि दीर्घकालीन आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी ते अधिक महत्वपूर्ण भूमिका बजावत असते. शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी प्रत्येकाच्या यशासाठी शिक्षण अत्यंत आवश्यक असते. शिक्षणामुळे प्रत्येकाच्याच जीवनातील आव्हाने कमी होतात. आपण जितके अधिक ज्ञान मिळवू तितक्या अधिक संधी आपल्याला करिअर आणि वैयक्तिक वाढीच्या दृष्टीने प्राप्त करण्यास अनुमती मिळत असते. शिक्षण महत्वाचे असल्याचे अजून एक महत्वाचे कारण म्हणजे ते आपल्याला जीवनाकडे पाहण्याचा एक अद्वितीय दृष्टीकोन विकसित करण्यास मदत करते. हे लोकांना चांगले नागरिक बनण्यास, चांगल्या पगाराची नोकरी मिळविण्यात मदत करते, चांगले आणि वाईट मधील फरक दर्शवते. शिक्षण आपल्याला कठोर परिश्रमाचे महत्त्व दर्शवते आणि त्याच वेळी, आपल्याला वाढण्यास आणि विकसित करण्यास मदत करते. शिक्षण म्हणजे सामाजिकीकरणाच्या विविध औपचारिक आणि अनौपचारिक माध्यमांच्या वातावरणात शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या पद्धतींशी संबंधित असलेल्या शिस्तीचा एक महत्वाचा भाग आहे.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## अनाथांची माता | दिसली रे ||

पायाला लागावी | ओढ पंढरीची ||
आस विठ्ठलाची | मना लागो ||१||

जगुनी पाहिले | व्यवहारी जगी ||
स्वार्थाचेच भोगी | संगतीला ||२||

नाही प्रेम माया | आटला जिव्हाळा ||
कोरडा उमाळा | क्लेषदायी ||३||

अंगाईचा सूर | हरवला देवा ||
म्हणूनी या जीवा | सुख नाही ||४||

तुझ्या पायरीला | टेकता हा माथा ||
अनाथांची माता | दिसली रे ||५||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"


आधुनिक केसरी

**लोभश्चेदगुणेन किं पिशुनता यद्यस्ति किं पातकैः**
**सत्यं चेत्तपसा च किं शुचि मनो यद्यस्ति तीर्थेन किम्।**
**सौजन्यं यदि किं गुणैः सुमहिमा यद्यस्ति किं मण्डनैः**
**सद्विद्या यदि किं धनैरपयशो यद्यस्ति किं मृत्यूना।।**

**अर्थ :** माणसाला लोभ असेल, तर अन्य दुर्गुण कशास हवा? कलह लावण्याची वृत्ती आहे, तर अन्य पापाची काय आवश्यकता? सत्य आहे, तर अन्य तप कशास हवे? मनाची विशुद्धता आहे, तर तीर्थाची काय आवश्यकता? सौजन्य असेल, तर अन्य गुणांची काय आवश्यकता? व्यापकता आहे, तर कोणत्या अलंकाराची काय आवश्यकता? चांगले शिक्षण आहे, तर धनाची काय आवश्यकता? तसेच अपकीर्ती असेल, तर मृत्यूची काय आवश्यकता? या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी माणसाच्या गुण-दोषांची चर्चा केली आहे. ते म्हणतात की, लोभ हा मोठा दुर्गुण आहे. कलह लावण्याची वृत्ती पाप आहे. सत्य हेच तप आहे. मनाची विशुद्धता ही तीर्थासमान आहे. सौजन्य हा सद्गुण आहे. व्यापकता हा एक उत्तम अलंकार आहे. चांगले शिक्षण हेच धन होय. अपकीर्ती ही मृत्युसमान आहे.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



### मुमुक्षुलक्षण

आधुनिक केसरी

जीवन जगत असताना घरीदारी,कामाच्या ठिकाणी, कुणाला संतुष्ट केले नाही. माझे पूर्वपाप म्हणून माझ्या हातून कोणतेही सत्कर्म घडले नाही. माझे मन सदा आडमार्गाने गेले. सत्कर्म करण्यासाठी काया,वाचा,मनाने कशाचीही झीज होऊ दिली नाही. परोपकार केला नाही. कामवासनेच्या मस्तीने चंचल स्वभाव आवरू शकलो नाही. भक्तिरूपी माऊलीला बुडवून टाकली,शांतिरूपी विश्रांती मोडून टाकली. भगवंता पर्यन्त पोहचवण्यासाठी ऊपयोगी पडणारीबुद्धि व वासना दोन्ही मी मूर्ख पणाने विकल व असमर्थ करून टाकली. अविचारा पगडा मनावर ऐवढा बसला होता की माझ्यापाशी ‘विवेक’ऊरलाच नाही. लौकिक अर्थाने प्रपंचात पूरा बद्ध झालो. श्रद्धा, प्रेम माया ममत्व हे माझ्या मनात कधी ऊत्पन्न झालेच नाही. आतापर्यंत जे जे कर्म केले ते ते सर्व लौकिकात बरे दिसावे म्हणून केलेकर्माचा सगळा खटाटोप वरपांगी होता. तो एक प्रकारचा दंभाचार होता.


**मुमुक्षुलक्षण**

पोट भरण्यासाठी किर्तन केले. देव बाजारात मांडायला मागेपुढे बघितले नाही.त्यावर अनेक खोट्या थापा मारून पैसै मिळवले रंजल्या गांजल्यांना अडवणूक करून त्यांनाही त्रास दिला.माझी बुद्धी किती खोटी व पापी आहे. हे मी जाणतो. मनात अभिमान ठेवून बाहेर मात्र निरभिमानपणाच्या थापा मारीत राहिलो ,मनात पैशाची वासना ठेवून बाहेर मात्र परमेश्वराचे ध्यान लागले असल्याचे सोंग केले. शास्त्राचें पांडित्यज्ञान फक्त माझ्याकडे आहे असे सांगून लोकांना फसवले. ,केवळ पोटासाठी संतांची ‘निंदा’केली. सत्याचा त्रागा केला. त्याचा नाश करण्याचा प्रयत्न केला. खोट्याचे सरळ सरळ प्रतिपादन केले. केवळ पोट भरण्यासाठी अशी निंदनीय दोष कर्मे केली. अशाप्रकारे ज्याला खरा पश्चाताप होतो जो उपदेशाने आतबाहेर बदलतो त्यालाच समर्थ रामदास स्वामी ‘मुमुक्षु ‘ म्हणतात.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# सर मी पण तुमच्या सारखाच शिक्षक झालो

“सर, ओळखलंत मला? मी विश्वास, तुमचा विद्यार्थी, ४० वर्षांपूर्वीचा.”
“नाही रे, नीट दिसत नाही आजकाल आणि स्मृतीही दगा देऊ लागली आहे. बरं ते जाऊ दे, तू बोल, काय करतोस आजकाल?”
“सर, मी पण तुमच्या सारखाच शिक्षक झालोय.”
“अरे वा, हो का? पण काय रे, शिक्षकांचे पगार एवढे कमी, तुला का रे वाटलं शिक्षक व्हावंसं ?”
“ सर, तुम्हाला मी आठवेन बघा. मी सातवीत असतांना आपल्या वर्गात एक घटना घडली होती आणि मला तुम्ही त्यातून वाचवलं होतं. खरं तर तेव्हाच मी ठरवलं होतं कि तुमच्या सारखंच शिक्षक व्हायचं.
“असं काय बरं झालं होतं तेंव्हा वर्गात?”
“सर, आपल्या वर्गात एक अक्षय नावाचा श्रीमंत मुलगा होता. एक दिवस तो हाताचं घड्याळ लावून आला. आमच्या कुणाकडेच तेव्हा घड्याळ नव्हतं. ते घड्याळ चोरायची माझी इच्छा झाली. आणि खेळाच्या तासाला जेव्हा मी पाहिलं कि त्याने घड्याळ कंपास पेटीत काढून ठेवलंय, मी योग्य संधी साधून ते माझ्या खिशात घातलं. पुढचा तास तुमचा होता. तुम्ही वर्गात येताच अक्षयने तुमच्या जवळ घड्याळ चोरीची तक्रार केली. तुम्ही आधी वर्गाचं दार आतून लावून घेतलंत. म्हणालात,”




ज्याने कोणी घड्याळ घेतले असेल, त्याने ते परत करावे, मी शिक्षा करणार नाही.”
माझी हिम्मत होईना कारण मी ते परत केले असते तर आयुष्यभर माझी सर्वांनी “चोर” म्हणून हेटाळणी केली असती. पुढे तुम्ही म्हणालात,” उभे रहा सारे एका लाइनीत आणि बंद करा आपले डोळे. मी सर्वांचे खिसे तपासणार आहे. मात्र सर्वांचे खिसे तपासणे होईपर्यन्त कुणीही डोळे उघडायचे नाहीत.”
तुम्ही एक एक करत सर्वांचे खिसे तपासत माझ्या जवळ आलात, माझी छाती धडधडत होती. तुम्ही माझ्या खिशातून ते घड्याळ काढलंत पण तरीही उरलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे खिसे तपासलेत आणि ते झाल्यावर आम्हाला डोळे उघडायला सांगितलं. तुम्ही अक्षयला ते घड्याळ देऊन म्हणालात,”
बाळ,पुन्हा घड्याळ घालून वर्गात येऊ नकोस आणि ज्याने कोणी ते घेतलं होतं, त्यानं असं गैरकृत्य पुन्हा करायचं नाही “ आणि नेहमी प्रमाणे तुम्ही शिकवायला सुरुवात केलीत.
तेव्हाच काय पण पुढे मी शालांत परीक्षा उत्तीर्ण होऊन शाळा सोडली तरी तुम्ही माझ्या चोरीची ना कधी वाच्यता केली, ना कधी मला ते दर्शवलंत. सर, आजही माझे डोळे पाणावतात ते आठवून. सर, मी तेव्हाच ठरवलं होतं की मी पण तुमच्याच सारखा शिक्षक होणार आणि मी झालोही. “
“अरे, हो, हो, आता मला आठवते आहे ती घटना. पण मला या घटकेपर्यंत माहीत नव्हतं कि ते घड्याळ मी तुझ्या खिशातून काढलं होतं, कारण....
कारण तुमचे सर्वांचे खिसे तपासून होईपर्यंत मी सुध्दा स्वतःचे डोळे बंद ठेवले होते जेणे करून माझे त्या मुला बद्दल मत खराब होऊ नये.”
सर्व निस्वार्थ, ध्येयवेड्या व निष्पाप शिक्षकांना सादर समर्पीत,ज्यांनी अख्ख्या पीढ्यां नं पीढ्या घडवल्यात.. त्यांना जाहीर प्रणाम,शतशः वंदन..!!

# लासूरच्या बाजार समितीला शेतकऱ्यांचा झटका

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल झिंजूर्डे पाटील**

**गंगापूर :** मराठवाड्यातील क्रमांक दोनची कृषी उत्पन्न बाजार समिती असलेल्या लासूर स्टेशन येथील बाजार समितीच्या अख्त्यारीतील कांदा मार्केटच्या कांदा व्यापाऱ्यांनी सुरक्षेचे कारण देऊन कांद्याचा लिलाव सोमवारी बंद ठेवला होता, मात्र बाहेर तालुक्याच्या शेतकऱ्यांना बंद बाबतची पुर्वसूचना नसल्याने पैठण, गंगापूर, कन्नड व इतर ठिकाणच्या शेतकऱ्यांनी कांदा विक्रीसाठी आणला होता. मात्र सकाळीच शिल्लेगाव पोलिसांनी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून स्वतः पोलीस निरीक्षक एक उपनिरीक्षक तर दहा पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवला होता व कांदा मार्केटच्या मुख्य गेटला ताळे ठोकल्याने शेतकरी गेटपासूनच माघारी निघत होते. याबाबतची माहिती शेतकरी नेते संतोष पाटील जाधव, आ.प्रशांत बंब यांचे स्वीय सहाय्यक तथा धामोरीचे उपसरपंच रवी पाटील चव्हाण, भाजपयुमोचे जिल्हा उपाध्यक्ष अमोल पाटील जाधव यांना शेतकऱ्यांनी दिली असता बाजार समितीच्या मुख्य कार्यालयायात त्यांनी ठिय्या मांडला व सचिव कचरू रणयेवले यांना धारेवर धरून तात्काळ लिलाव पुन्हा चालू करण्याचे लेखी निवेदन दिले.

त्यात त्यांनी ऐन हंगामात शेतकऱ्याची गैरसोय होऊ नये म्हणुन सोमवार दि. २३/५/२०२२ रोजी कांदा मार्केट बंद न ठेवता कांदा खरेदी चालु ठेवावी असे म्हटले होते. तरीही शेतकरी वर्गाचा विचार न करता कांदा मार्केट बाजार समितीने बंद ठेवले व बाजार समिती कार्यालयाकडुन कुठलीही पूर्वसूचना न देता अवघ्या एक दिवसाची मुदत देत सोमवार दि.२३ मे रोजी बाजार समितीच्या कांदा खरेदी बंद ठेवण्यात आली. हा निर्णय अत्यंत चुकीचा घेतल्याने ऐन पावसाच्या तोंडावरच बि/बियाणे, खते खरेदी करण्यासाठी बळीराजा मिळेल त्यां भावाने कांदा विक्रीसाठी आणत होता सध्या पावसाचे ढग असूनही कांदा साठवण्याची व्यवस्था नसल्याने शेतकऱ्याचा कांदा शेतातच पडुन असल्यामुळे आधीच त्यांचा जीव तंगणीला आहे आणि शेतकऱ्यांना शेतीचे पेरणीचे दिवस तोंडावर असल्यामुळे खते, बियाणे, औषधी, सह शेती उपयोगी साहित्य खरेदी करण्याची लगबग असतानांच कांदा खरेदी बंद ठेवण्याचा निर्णय बाजार समीतीने घेतल्याने शेतकऱ्यांची आर्थिक अडचण होऊन शेतकरी हवालदिल झाले, असूनही सोमवारी दुपारपर्यंत कांदा मार्केट शंभर टक्के बंद होते. त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला येऊन आक्रमक झाला. त्यामुळे बाजार समितीचे सचिव कचरू रणयेवले यानी बंदची सपसेल माघार घेत शेतकऱ्यांना लेखी पत्रच दिले व ज्या शेतकऱ्यांचा कांदा मार्केटमध्ये आला असेल तो खरेदी करण्याचा निर्णय घेतला व तसे लेखी पत्रही शेतकऱ्यांना देण्यात आले.

दरम्यान सकाळी बाजार समितीत व्यापाऱ्यांनी बंद पाळल्याने शुकशुकाट होता मात्र दुपारनंतर शेतकरी आक्रमक झाल्याने पुन्हा लिलाव सुरळीत झाला होता मात्र कांद्याची आवका मोठ्या प्रमाणात घटली होती.



**“ माझ्या बहिणीचे लग्न दोन दिवसावर आल्याने मी एक ट्रॉली भरून कांदे विक्रीसाठी लासूर स्टेशनला आणला होता मात्र मार्केट बंद असल्याची कल्पना नव्हती. त्यामुळे कव्डीमोल भावात मी ट्रॉलीभर कांदा बाहेरच्या व्यापाऱ्याला विकला ही शेतकऱ्याची एकप्रकारे अडवणूक आहे.**

**विकास कोरडे, शेतकरी, बिडकीन**

**“ आम्ही सर्व व्यापाऱ्यांनी सुरक्षेच्या मुद्द्यावर कांदा मार्केट बंद ठेवले होते. आमचा आकस हा शेतकऱ्यांविषयी नसून आमच्या एका व्यापाऱ्याला एका वाहनचालकाने दगडाने मारहाण केली होती. त्यामुळे व्यापाऱ्यांचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्याने बाजार समितीने सुरक्षा द्यावी म्हनून लेखी पत्र व्यापारी वर्गाने देऊन एकदिवसीय बंद पुकारला होता त्यात शेतकऱ्याची अडवणूक करण्याचा प्रश्नच नाही.**

**कृष्णा कऱ्हाळे, उपाध्यक्ष, कांदा व्यापारी असोसिएशन**

**“ शेतकऱ्यांना कुठलीही पुरवसूचना न देता बाजार समितीने व्यापाऱ्यांपुढे अक्षरशः गुडघे टेकले व कांदा मार्केट बंद ठेवले होते. मुळात मार्केट बंद ठेवण्यासाठी बाजार समितीला आठ दिवस अगोदर पत्र देणे बंधनकारक असते किंवा तरीही मार्केट बंद ठेवायचे असल्यास व खरेदीदार व्यापारी संपवार गेल्यास महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी/विक्री (विकास व विनियमन) अधिनियम 1963 अन्वये नाशवंत अथवा टिकाऊ शेतीमाल खरेदी करणारा कुठलाही लायसनधारक व्यापारी अथवा त्यांचा वर्ग संपवार गेला तर कायम चालू असलेला व्यापार चालू ठेवण्यासाठी बाजार समिती सक्षम अशी पर्यायी व्यवस्था करण्यास सक्षम आहे, असे समजण्यात येईल असा कायदा अधिनियम आहे मात्र हा अधिनियम बाजार समिती न पाळता शेतकऱ्यांच्या आर्थिक मुळावर कुऱ्हाड मारण्याचे पाप करत होती. मात्र शेतकऱ्यांच्या दबावापुढे अखेर बाजार समिती सपसेल माघारी फिरली व कांदा लिलाव चालू करण्याचे लेखी पत्रा शेतकऱ्यांना दिला हा शेतकरी एकजुटीचा विजय आहे.**

**संतोष पाटील जाधव**



# भाशिप्र संस्था निवडणुकीमध्ये उत्कर्ष पॅनलचा दणदणीत विजय

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी समिती निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून संघ प्रणित उत्कर्ष पॅनलने दणदणीत विजय संपादन केला आहे. उत्कर्षचे 20 पैकी 19 उमेदवार विजय झाले आहेत तर प्रतिस्पर्धी सन्मान पॅनलला पराभव स्वीकारावा लागला. या पॅनलमधील पॅनलप्रमुख प्रा. सतीश पत्की, पंजाबराव मस्के पराभूत झाले. मराठवाड्यातील सर्वात जुनी आणि नामांकित समजल्या जाणाऱ्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई च्या कार्यकारी समितीची निवडणूक रविवारी पार पडली. रविवार दि. 22 मे रोजी सकाळी आठ ते दुपारी चार वाजेपर्यंत मराठवाड्यातील मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला रात्री उशिरा मतमोजणी झाल्यानंतर उत्कर्ष पॅनलचे 19 उमेदवार विजयी झाले. यात हितचिंतक सभासद मतदारसंघ- राम कुलकर्णी, जितेश चापसी, प्रवीण सरदेशमुख, सर्वसाधारण सभासद मतदार संघ - सत्यनारायण लोहिया, शंकरराव लासुणे, डॉ.कल्पना चौसाळकर, डॉ.सुरेंद्र आलुरकर, विष्णू कुलकर्णी, डॉ.हेमंत वैद्य, विजय चाटुफळे, अमरनाथ खुरपे, माणिक भोसले, ज्योती ठाकुर, प्रकाश दुगड, सेवक सभासद मतदारसंघ- आप्पाराव यादव, कर्मचारी प्रतिनिधी मतदार संघ - संजय गुरव, उमेश जगताप, संस्कार केंद्र प्रमुख प्रतिनिधी- मतदारसंघ बाबुराव आडे, विष्णू सोनवणे हे उमेदवार विजय झाले.

या निवडणुकीकडे संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागून होते संघ प्रणित उत्कर्ष पॅनल विरुद्ध सतीश पत्की, पंजाब मस्के यांनी निर्माण केलेला सन्मान पॅनल अशी लढत झाली. निवडणूक निकालानंतर संजय विचाराने चालणाऱ्या या शिक्षण संस्थेवर संघाचे वर्चस्व कायम असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह नितीन शेटे यांच्या मार्गदर्शना खाली उत्कर्ष पॅनल ने हे यश संपादन केले.

### संघशक्तीचा विजय : प्रा. चंद्रकांत मुळे

**भाशिप्र च्या निवडणुकीमध्ये प्रतिस्पर्धी सन्मान पॅनल ने राष्ट्रीय स्वयंसेवक संघा याविषयी अतिशय खालच्या भाषेत जाऊन टीकाटिप्पणी केली. परंतु संघशक्तीमध्ये आणि संस्कारांमध्ये वाढलेल्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या सभासदांनी अशा अपप्रवृत्तींना मतदानातून चोख उत्तर दिले या निवडणुकीत उत्कर्ष पॅनलचा झालेला विजय हा संघशक्तीचा विजय आहे, अशी प्रतिक्रिया संस्थेचे सहकार्यवाह प्रा. चंद्रकांत मुळे यांनी व्यक्त केली आहे.**

# शॉर्टसर्किटमुळे बँकेतील संगणक जळाले

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दि.२३ सोमवार रोजी सकाळी सकाळी अकरा वाजेच्या दरम्यान गावठाण डिपीवरती अचानक मोठा आवाज होऊन फॉल्ट झाल्यामुळे महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा सावळदबारा व जिल्हा मध्यवर्ती सहकार बँक सावळदबारा या दोन्ही बँकेत डिपीवरती शॉर्ट सर्किटमुळे महाराष्ट्र ग्रामीण बँकेत व जिल्हा मध्यवर्ती बँकेत संगणक व इतर काही साहित्य जळाली तसेच पो.पा.विलास कुल्ले यांचे पण कँनान कंपनीचे झेरॉक्स मशिन जळाले इतर असे बसस्थानक परिसरात नुकसानी झालेल्या आहेत.

महावितरण कार्यालयात माहिती मिळताच सावळदबारा येथील ३३ केव्ही महावितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता योगेश जाधव व वायरमन ज्ञानेश्वर घोडके व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन गावठाण डिपीवरचा फॉल्ट काढून लाईन सुरळीतपणे केली आहे. परंतु दोन्ही बँकेचे काही साहित्य जळाल्यामुळे तांत्रिक अडचण असून अंदाजे दोन ते तीन दिवस बँकेचे व्यवहार बंद आहे राहील इतर व्यवहार चालू राहील याची खातेदारांनी दक्षता घ्यावी लवकरच टेकनिकल येऊन प्राबलोम सुधारणा करून दिली जाईल, असे महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक मयूर सोनटक्के, काशीनाथ वावरे, शरद बोढारे, शिवा जैस्वाल, शिपाई राम भडजी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्यवस्थापाक ओम भुगोले व रतनाकर हुबंरे यांनी बोलताना सांगितले.

# सुख शांती समाधान संस्थेतर्फे नि:शुल्क योग शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** काटोल रोड येथील, जागृती व RBI कॉलनी येथे मागील ९ ते २२ मे यादरम्यान पंधरा दिवसाचे योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आनंदी व समाधानी, निरोगी राहण्यासाठी शिबिराचे आयोजन केले होते.

शिबिराचा समापन सोहळा वामनराव बरडे स्मृती उद्यान अमृतभवन येथे निःशुल्क योग शिबीर आयोजित केलेल्या कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला असून यावेळी प्रमुख पाहुणे नरेश वामनराव बरडे तसेच संस्थेचे अध्यक्ष योगगुरू सचिन माथूरकर यांच्या अध्यक्षतेखाली शिबिर घेण्यात आले होते. योग व प्राणायाम बरोबर प्रत्येक विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासाकडे पण लक्ष दिले जात.

संस्थेचे अध्यक्ष योगगुरु सचिन माथुरकर यांनी निस्वार्थ भावनेने हे कार्य अविरत केले असून या कार्यक्रमाला संस्थेचे सर्व सदस्य उपस्थित होते. जागृती कॉलनीतील लोकांनी आयोजित कार्यक्रमात रोज सकाळी ६ ते ७ वाजता. शिबिराचा लाभ घेतला. यावेळी नीलिमा मस्के, राजेश मस्के, जस्मी तेलगोटे, पल्लवी भालेराव, अजय सातफळे, आणि आशुतोष मस्के यांनी खूप परिश्रम घेतलेत.

# ‘गटार’ ला राज्य एकांकिका स्पर्धेत सात पुरस्कारांसह प्रथम निर्मितीचा सर्वोत्कृष्ट पुरस्कार



आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** स्मितांकित उमरेडच्या अमोल खोब्रागडे स्मुती राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा काल दि.22 रोजी दिनदयाल नाटयगुह उमरेड येथे अतीशय जल्लोशात संपन्न झाला. यात संपुर्ण महाराष्ट्रात गाजलेल्या वीरेंद्र गणवीर लिखित व दिगदर्शीत बहुजन रंगभुमीच्या. ‘गटार’ या एकांकिकेने निर्मितीच्या सर्वोत्कुष्ट पारीतोषिकासह सात पुरस्कार पटकावुन पुन्श्च बहुमान मिळविलेला आहे.

या स्पर्धेत ॲबस्टक्ट आर्ट, डोंबिवली, मुंबई च्या यश नवले लिखित ‘नवरा आला वेशीपाशी’ दवीतीय आणी गंधर्व, अमरावतीची इरफान मुजावार लिखित ‘अस्थिकलश’ला तुतीय पारीतोषिक मिळाले आहे. गटारसाठी सर्वेत्कुष्ट लेखन-दिग्दर्शनाचा प्रथम पुरस्कार वीरेंद्र गणवीर तर अभिनयामध्ये अस्मिता पाटिल, रोहीत वानखेडे यांना द्वितीय पुरस्कार, नैपथाचा प्रथम पुरस्कार उत्कर्ष तायडे व शिवम मस्के तसेच प्रकाश योजनेचा द्वितीय पुरस्कार सुप्रिया भारती राजगुरु यांनी पटकाविलेला आहे. नाटकात श्रेयश अतकर, रिशील ढोबळे, प्रियांक उके, पल्लवी धाबरडे, अस्मिता पाटिल यांच्या भुमिका आहेत. तर पार्श्वसंगीत सौरभ कांबळे यांचे आहे. रंगमंचीय व्यवस्था प्राची जांभुळकर, रोहित साळवीकर याची होती. परिक्षक म्हणुन रुपराव कांबळी, चैत्यन्य आठल्ये, सुरेश बारसे यांनी काम पाहीले. राजेश गजभिये, मयुर कातोरे, अक्षय कोसे, हस्तदिप भोंगे, अजय सनेसर, रतन मेश्राम, मदन बुलकुंदे यांनी स्पर्धेकरिता परिश्रम घेतले.



# बिहारमध्ये राजकीय भूकंप ?

आधुनिक केसरी

महाराष्ट्रात राजकीय वातावरण तापले असतानाच आता बिहारच्या राजकारणातही खळबळ उडण्याची शक्यता आहे. बिहारचे मुख्यमंत्री आणि जनता दल युनायटेडचे नेते नितीश कुमार यांनी पक्षातील आमदारांना एक महत्त्वाचा आदेश दिला आहे. बिहारच्या राजकारणात मोठा राजकीय भूकंप होण्याची चिन्ह आहेत. एकीकडे लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दल पक्षाने भाजप आणि केंद्र सरकारविरोधात आघाडी उघडली आहे. तर, दुसरीकडे भाजपसोबत युतीमध्ये सरकार चालवणाऱ्या नितीश कुमार यांनीही आपला पक्ष जनता दल युनायटेडच्या आमदारांना एक महत्त्वाचा आदेश दिला आहे. त्यामुळे बिहारच्या राजकारणात चालले काय?, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी एक आदेश काढला आहे. पुढील ७२ तासांपर्यंत पटणासोडून कोणीही कुठे जाऊ नये, असे आदेश त्यांनी आमदारांना दिले आहेत. त्यामुळे पुढील ७२ तास बिहारच्या राजकारणासाठी महत्त्वाचे मानले जात आहेत. आज तक या वृत्तवाहिनीने यासंदर्भात बातमी दिली आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आपल्या पक्षातील नेते आणि आमदारांसोबत सातत्याने बैठक घेत आहेत. नितीश कुमार हे अचानक इतके सक्रीय झालेले पाहून राजकारणात फेरबदल होण्याची चिन्हे असल्याचे बोलले जात आहे. नितीश कुमार पुन्हा एकदा भाजपची साथ सोडून आरजेडीसोबत सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न करणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. या सगळ्या प्रश्नांची उत्तरे आता येत्या ७२ तासांत मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे बिहारचे राजकारण आता कुठल्या वळणावर येऊन ठेपणार आहे हे येत्या ७२ तासांत कळणार आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी दोन दिवसांपूर्वीच पक्षाच्या कार्यालयात आपल्या पक्षाचे मंत्री व आमदारांसोबत चर्चा केली. यावेळी पक्षातील माजी आमदारदेखील उपस्थित होते. या बैठकीदरम्यान नितीश कुमार यांना लालू प्रसाद यादव यांच्यावर झालेल्या छापेमारीबाबत विचारण्यात आल्यावर त्यांनी ज्यांनी छापा टाकला तेच सांगू शकतात असे उत्तर दिले होते. नितीश यांच्या उत्तराचा रोख भाजपच्या दिशेने होता असे सांगण्यात येते. दरम्यान, गेल्या महिन्याभरापासून घडणाऱ्या घडामोडी पाहिल्यास नितीश कुमार आणि आरजेडी नेता तेजस्वी यादव यांची भेट झाली होती. या भेटीदरम्यान, त्यांच्यात काय चर्चा झाली हे मात्र गुलदस्त्यात आहे. तसेच, नितीश कुमार यंदाच्या इफ्तार पार्टीसाठी त्यांच्याघरापासून चालत राबडी देवी यांच्या घरी पोहोचले होते. त्यामुळे या चर्चांना अधिक जोर धरला आहे. आरजेडीनंतर नितीश कुमार यांच्या पक्षातील नेत्यांनी तेजस्व यादव आणि लालू यादव यांच्या घरातील सदस्यांना इफ्तार पार्टीचे आमंत्रण दिले होते. तिथेच नितीश कुमार व तेजस्वी यादव यांच्यातील राजकीय दुरावा कमी झाल्याचे बोलले जाते, तसेच, याआधीही नितीश कुमार व तेजस्वी यादव यांच्यात बंद दाराआड चर्चा झाली.

# वयं पंचाधिकं शतम्!

आधुनिक केसरी



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

**नुकतेच राहुल गांधी लंडनमध्ये गेले होते. तेथे त्यांनी एका परिषदेमध्ये भाग घेतला व तेथील आपल्या भाषणात ते म्हणाले की "भारत आता चांगला देश राहिलेला नाही". ते म्हणाले की भारताची परिस्थिती आता पाकिस्तान किंवा श्रीलंके सारखी झालेली आहे. या देशांमध्ये इडी आणि सीबीआयचा गैरवापर सुरू आहे. विरोधकांना संपवण्यासाठी या संस्था काम करीत आहे. नरेंद्र मोदी कोणाचे ऐकत नाही व चीनबद्दल ते काहीही बोलत नाही. संपूर्ण देशामध्ये भाजपाने केरोसीन टाकून ठेवलेले आहे. एक छोटीशी ठिणगी पडली तरी संपूर्ण देश पेटून उठेल व एका मोठ्या संकटात सापडेल.**

ते असेही म्हणाले की लद्दाख ची परिस्थिती युक्रेनसारखी आहे. विविध देशांमध्ये जाऊन अशा पद्धतीची बेताल बडबड करण्याची राहुल गांधी यांची काहीही पहिलीच वेळ नाही. नरेंद्र मोदी कोणाचे ऐकत नाही. काय ऐकत नाही 130 कोटी लोकांना भारतात निर्माण केलेली लस दिल्या गेली पाहिजे. कारण विदेशातून जर लस आयात केली तर देशाला खूप मोठी किंमत चुकवावी लागेल. व्यापार आता देश पातळीवरचा राहिलेल्या नसून तो आंतरराष्ट्रीय पातळीवरचा झालेला आहे. एखाद्या रोगाचे निदान करायचे, त्याच्या बद्दलची भीती समाजामध्ये निर्माण करायची व त्या पाठोपाठ त्याच्यावर असलेल्या उपायांची जाहिरात करायची. त्याची लस गरीब देशांना आणि सर्व जगभर विकायची अशा पद्धतीचा हा व्यवसाय आहे. कोरोनाच्या काळामध्येसुद्धा 130 कोटी लोकांना लस विकण्याची जगातील मोठ-मोठ्या औषध माफियांना फार मोठी संधी होती. परंतु देश हित सर्वप्रथम अशा पद्धतीचे घोषवाक्य असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विदेशी औषध माफिया यांचे काहीही चालू दिले नाही. व भारतात अवाजवी किंमत असलेली कुठलीही विदेशी लस येऊ दिली नाही. म्हणून राहुल गांधी कदाचित म्हणत असतील की मोदी कोणाचे ऐकत नाही.

बोफोर्स घोटाळा आपल्या सगळ्यांना माहिती आहे. राहुल गांधी यांच्या वडिलांचे आणि त्यांच्या इतर निकटवर्तीयांचे नावं या घोटाळ्यात घेतले गेले होते. संरक्षण विषयांमध्ये विविध उपकरण, यंत्रसामुग्री, दारुगोळा, विमान या सर्वच गोष्टींमध्ये दलाली खाण्याची पद्धत होती. अधिकृत दलाल विदेशातून नियुक्त केले जायचे. ते भारतातील दलालांशी संपर्क साधून सरकारच्या जवळच्या व्यक्तीपर्यंत पोहचायचे आणि आपली निविदा स्वीकृत करून घ्यायचे. अब्जो रुपयांचा हा जागतिक स्तरावरचा व्यापार होता आणि आहे. वेगवेगळ्या देशांमध्ये युद्ध सुद्धा आपल्या देशातील संरक्षण विषयक शस्त्रसामग्री विकली गेली पाहिजे म्हणून करविले जातात. सर्वसामान्य माणसाला यातील काहीच माहीत नसते परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या रक्षा माफीयांनासुद्धा चाप बसविलेला आहे. त्यांनी मेक इन इंडिया अंतर्गत रक्षा सामुग्री स्वदेशी असली पाहिजे यावर भर दिलेला आहे. म्हणजे काही गोष्टी या संपूर्णपणे भारतीय बनावटीच्या असतील तर काही गोष्टी ज्या विदेशात बनत होत्या त्या आता भारतात बनतील. परंतु त्याला लागणारे सुटे भाग हे भारतीय कंपन्यां द्वारा निर्माण केलेले असतील. ज्या कंपन्या आज सुटे भाग बनवतील उद्या त्या संपूर्ण उपकरणच बनवू शकतील. हा मोदींचा विश्वास आहे. जगातल्या रक्षा माफियांना भारतामध्ये केलेला "प्रवेश बंद" यामुळे सुद्धा राहुल गांधींना वाटत असेल की मोदी कोणाचे ऐकत नाही.

स्व. पंतप्रधान राजीव गांधी यांनी एका सभेमध्ये केलेले विधान सर्वश्रुत आहे. त्यामध्ये ते म्हणतात की केंद्र सरकारकडून शेतकऱ्यासाठी एक रुपया जर पाठवला गेला तर त्यापैकी केवळ सोळा पैसे त्याच्यापर्यंत पोहोचतात. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तळागाळातील या समस्येचा अनुभव आपल्या संपूर्ण आयुष्यात घेतलेला असल्यामुळे त्यांनी आज प्रत्येक शेतकऱ्याचे, मजुराचे खाते हे आधार कार्डची जोडून सरकारद्वारे पाठविली जाणारी प्रत्येकास मदत सरळ त्याच्या खात्यात जमा करण्याचा विक्रम केलेला आहे. त्यामुळे "न खाऊंगा, और न खाने दुंगा" ही त्यांची घोषणा त्यांनी सार्थ करून दाखविली आहे. त्यामुळे अनेक नोकरशहा, राजकारणी असे अनेक लोक नाराज झाले तर त्यात नवल काय? फक्त हीच नाराजी कदाचित राहुल गांधींनी लंडनमध्ये बोलून दाखवलेली असेल.

मोदी कोणाचे ऐकत नाही. शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने तुम्ही शेतकऱ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवली व देशांमध्ये शीख समाज पुन्हा एकदा राष्ट्रीय प्रवाहापासून दूर जाईल अशा पद्धतीची परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मृतवत झालेले खलिस्तानवादी यांना सुद्धा जागृत करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मोदी सरकारने हे कृषी कायदे वापस घेतले. त्यामुळे इथे मोदी सरकारने तुमचे ऐकले असे तुम्ही म्हणायला हरकत नव्हती.

देश पेटवण्याचा प्रयत्न साहेब तुम्ही करता आणि म्हणता की भाजपाने देशात केरोसिन सर्वत्र पसरवून ठेवलेले आहे. म्हणजे विदेशात तुमचा जेव्हा जेव्हा प्रवास होतो त्यानंतर भारतात काहीतरी नविन उपद्रव झालेला पाहायला मिळाला आहे. तत्कालिन अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारत प्रवासाच्या वेळेस दिल्लीमध्ये दंगल भडकविण्यात आली. ही दंगल पूर्वनियोजित होती असे माननीय न्यायालयाने सुद्धा म्हटलेले आहे. हा देशाची प्रतिमा खराब करण्याचाच एक प्रयत्न होता. 370 कलम रद्द करतानासुद्धा भारताची विदेशामध्ये प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. शेतकरी आंदोलनामध्ये विविध देशातील लोकांना जोडून भारताची प्रतिमा शेतकरीविरोधी करण्याचे काम सुद्धा तुम्ही केले आहे. भारतात मुस्लिम सुरक्षित नाही हा प्रचार सुद्धा तुम्ही व तुमचे नेते विदेशात करीत असतात. इतके वर्ष खाण्याची सवय लागलेल्या लोकांना आता जर भारतात खायला काही मिळत नसेल तर त्यांना सहाजिकच भारत हा चांगला देश नाही असे म्हणावेसे वाटू शकते.

फार पूर्वी कवी इक्बाल यांनी सारे जहाँ से अच्छा हे गीत लिहिले. त्यात तो म्हणतो की "हम बुलबुलें हैं इसकी,यह गुलिस्ताँ हमारा"त्याही वेळेस भारतातील देशभक्त जनतेने याचा विरोध केला होता. कारण बुलबुल हा पक्षी नेहमी सुंदर बगीचा शोधत असतो. जर बगीच्या वाळला किंवा नष्ट झाला तर तो हा बगीच्या सोडून दुसऱ्या बगीच्याकडे प्रस्थान करतो. परंतु भारत ही आमची मातृभूमी आहे. भारत हा आमच्या प्रयत्नाने परम वैभवशाली होणार आहे.त्यामुळे हा काही बगीचा नाही की ज्यामध्ये देश-विदेशातील पक्षांनी येऊन बसावे आणि मनाप्रमाणे क्रीडा करावी व जेव्हा इच्छा असेल तेव्हा याला संकटात सोडून जावे. जसे तुम्ही कारगिल युद्धाच्या वेळी इटलीला निघून गेले होते. तुमच्या घराण्याचा इतिहास हा युद्धाच्या प्रसंगी देश सोडून जाण्याचा आहे. यावरून काय स्पष्ट होते की तुम्ही खरोखरच त्या बुलबुल पक्षाप्रमाणे आहात आणि म्हणून आज तुम्हाला भारत चांगला देश वाटत नाही. एखाद्याची आई तरुण सुंदर असेल किंवा म्हातारी असेल किंवा रोगी असेल तरीही त्याच्यासाठी ती नेहमीच प्रिय व वंदनीय असणारच आहे. जे लोक इथली संस्कृती मान्य करत नाही त्यांची मानसिकता देशाला सोडून जाण्याची व भाकड गाय कसायाला विकण्याची असू शकते. त्यालाच "युज अँड थ्रो" वापरा आणि फेकून द्या अशी मानसिकता म्हणतात.

भारतीय जनसंघाचे संस्थापक स्वर्गीय शामाप्रसाद मुखर्जी यांनी सुद्धा कधीही विदेशी लोकांसमोर नेहरू सरकारची बदनामी केली नाही. अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी ज्या ज्या वेळी विदेश दौऱ्यावर गेले त्या प्रत्येक वेळी त्यांनी सरकारच्या नीतीवर किंवा सरकारवर कुठलीही टीका केली नाही. ज्या वेळेला त्यांना विचारण्यात आले की तुम्ही तर विरोधी पक्षाचे नेते आहात मग सरकारवर तुम्ही टीका कशी करीत नाही? तर त्याही वेळेला या सर्वच नेत्यांनी आम्ही विदेशात असताना भारताचे प्रतिनिधी आहोत भाजपाचे किंवा जनसंघाचे नेते नाहीत अशा पद्धतीची भूमिका घेतलेली होती.

महाभारतामध्ये याबद्दलची योग्य शिकवण देणारा एक उत्तम प्रसंग आहे. पांडव ज्यावेळेस वनवासामध्ये होते त्यावेळेस पांडवांचा उपहास करण्याच्या उद्देशाने दुर्योधन कर्ण व त्याचे इतर साथीदार सेना घेऊन पांडव ज्या वनात राहत होते त्या वनात जायला निघतात. वाटेमध्ये त्यांना एक सरोवर दिसते. त्या सरोवरामध्ये आपण स्नान केला पाहिजे असे दुर्योधनाला वाटते. ज्या वेळेस दुर्योधन स्नानासाठी त्या सरोवरामध्ये उतरायला जातो त्यावेळेस तिथे असलेला रक्षक त्याला म्हणतो कि गंधर्वाचा राजा चित्रसेन त्याच्या स्त्रियांसह जलक्रीडा करीत आहे. त्यामुळे आपणास थोडा वेळ थांबावे लागेल. हे ऐकून दुर्योधन त्याच्या स्वभावाप्रमाणे रागावतो व चित्रसेना ला युद्ध करता बोलावतो. या युद्धामध्ये दुर्योधन व कर्ण या सर्वांचा चित्रसेन पराभव करतो. व दुर्योधनाला बंदी बनवतो. ही बातमी त्या वेळेला पांडवांना समजते. त्या वेळेला अर्जुन व भीम हे फार आनंदित होतात. व म्हणतात बरे झाले दुर्योधनाचा अहंकार चक्काचूर झाला. परंतु त्यावेळेस युधिष्ठिर त्यांना सांगतात की कौरव आणि पांडव यांच्या वादांमध्ये आम्ही पाच आहोत आणि ते शंभर आहेत. परंतु ज्या वेळेस कोणी दूसरा आमच्याशी वाद करेल त्यावेळेस आम्ही 105 आहोत. देशाचा धर्म व संस्कृती मानणाऱ्या अटल बिहारी सारख्या नेत्यांकडून विदेशामध्ये "वयं पंचाधिकं शतम्" आम्ही 105 आहोत अशा पद्धतीची घेतलेली भूमिका ही काँग्रेस सहित सर्व पक्षांसाठी एक शिकवण आहे, पाथेय आहे असे वाटते. ज्या व्यक्तीकडे काँग्रेस पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून बघते किंवा काँग्रेसचे अनुयायी बघतात त्या राहुल गांधी यांनी कमीत कमी देशाची प्रतिमा विदेशामध्ये आपल्या बोलण्याने मलीन होणार नाही याचा नेहमी प्रयत्न केला पाहिजे.

# जनसामान्यांचे नेते : स्व.एकनाथराव घुगे

आधुनिक केसरी



प्रा. शिवाजी हुसे
मो. 9404000398

**काही माणसं आहे त्या परिस्थितीवर मात करून संघर्ष करीत आपापल्या क्षेत्रात नावारूपास आलेली असतात. त्यांना समाज डोक्यावर घेतो कारण त्यांची पाऊले ही नेहमी जमिनीवर असतात. काळाच्या कसोटीवर टिकून ही माणसं स्वतः ची पाऊलवाट स्वतः निर्माण करीत असतात. त्यापैकिच मला भावलेले एक सामान्य ते असामान्यत्वाला पोहचलेले समाजभूषण स्व. एकनाथराव घुगे हे होत. त्यांचे अकाली जाणे सर्वांनाच धक्कादायक होते. मात्र स्व. एकनाथराव घुगे हे नाव आजही केवळ जालना जिल्ह्यातच नव्हे तर समाजात व राजकीय, सामाजिक क्षेत्रात अजरामर ठरलेले आहे.**

काही माणसांना जन्मजात सत्ता, संपती, पदे मिळत असतात. त्या जोरावर ते आपले जीवन उभे करण्याचा प्रयत्न करीत असतात. शेती, घरदार, नोकर चाकर हे त्यांना सहजा सहजी मिळत असते. आयत्या पिठावर रेखोट्या ओढणे सोपे असते. त्यात स्वतः चे कर्तृत्व फारसे दिसून येत नाही. अशी माणसं समाजात आपणास पावलोपावली भेटत असतात. समाजात त्यांना मान, सन्मान मिळत असला तरी जनतेच्या हृदय रूपी सिंहासनावर ते विराजमान होऊ शकत नाही. त्या ऊलट ज्यांचा जन्म सामान्य कुटूंबात झालेला आहे. कोणतीही राजकीय, सामाजिक पार्श्वभूमी त्यांना असते. अशी माणसं आहे त्या परिस्थितीवर मात करून संघर्ष करीत आपापल्या क्षेत्रात नावारूपास आलेली असतात. त्यांना समाज डोक्यावर घेतो कारण त्यांची पाऊले ही नेहमी जमिनीवर असतात. काळाच्या कसोटीवर टिकून ही माणसं स्वतः ची पाऊलवाट स्वतः निर्माण करीत असतात. त्यापैकिच मला भावलेले एक सामान्य ते असामान्यत्वाला पोहचलेले समाजभूषण स्व. एकनाथराव घुगे हे होत. त्यांचे अकाली जाणे सर्वांनाच धक्कादायक होते. मात्र स्व. एकनाथराव घुगे हे नाव आजही केवळ जालना जिल्ह्यातच नव्हे तर समाजात व राजकीय, सामाजिक क्षेत्रात अजरामर ठरलेले आहे. बदनापूर तालुक्यातील भराडखेडा हे एक लहानसं खेडं . या गावात घुगे, दराडे, बारगजे ही मंडळी शेती, राजकारण व सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत. उद्योजक म्हणून



ही त्यांचा सर्वत्र लौकिक आहे. त्यांच्या मुळे या गावचे नाव सर्वत्र झाले आहे. याच गावात स्व. एकनाथराव घुगे यांचा जन्म झाला.

स्व .एकनाथराव घुगे हे जालना जिल्हयात अतिशय अल्प काळात, प्रचंड मेहनत, जिद्द, संघर्ष आणि प्रयत्न या बळावर शेती, राजकारण, समाजकार्य, उद्योग आदी क्षेत्रात नावारूपास आले होते . कोणतीही पार्श्वभूमी नसतांना त्यांनी स्व प्रयत्नाने विकास केला. मनमिळाऊ, शांत स्वभाव, आपुलकी, माणसाविषयी प्रेम, उत्तम स्नेही आणि माणूसकीमुळे ते समाजात लोकप्रिय ठरले. भराडखेडा गावच्या लोकांनी त्यांना अनेकवर्ष गावचे सरपंच केले. त्यांनीही गावाचा विकास केला. ज्या काळात गुत्तेदारी, राजकारण या क्षेत्रात सामान्य माणसं हिंमत करू शकत नव्हती त्या काळात ते या क्षेत्रात आले. खंबीरपणे उभे राहीले. अनेकांना गुत्तेदार केले. रोजगार दिला. एकनाथराव व भानुदासराव दोघे बंधू. अण्णा आणि नाना नावाने सुपरिचीत झाले. एकमत, एक विचार, सकारात्मकता, सहकार्य भावना आणि कष्ट करन्याची तयारी या बळावर त्यांनी आपले साम्राज्य उभा केले. भराडखेडा गावात ग्रामविकासाची चळवळ सुरु झाली आहे. आज हे गाव सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. या गावचे अनेक भूमिपुत्र विविध क्षेत्रात यशस्वी योगदान देऊन आपल्या गावाला एक नवी ओळख प्राप्त करून देत आहेत. त्याची प्रेरणा ही खऱ्या अर्थाने कर्मयोगी अण्णाच आहे. हे मान्य करावे लागते. **(क्रमशः)**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अध्यात्माचं दिव्य तेज, अमृतासम रसाळ वाणी, बाबामहाराज सातारकरांचे, व्यक्तिमत्त्व बहुगुणी !

आधुनिक केसरी




**ज्यांच्या चेहऱ्यावर अध्यात्मिक ज्ञानाचं दिव्य तेज विलसत असतं. आणि, ज्यांच्या वाणीतून अमृतधारा उत्स्फुर्तपणे वाहत असते. ज्यांच्या ओघवत्या शैलीने महाराष्ट्रातील भगवदभक्तांच्या मनावर गारुड केलेलं आहे, असे एक आदरणीय व्यक्तिमत्व म्हणजे श्रद्धेय हभप. बाबामहाराज सातारकर. समाजामध्ये अनेक व्यक्ती आपल्या गुणवैशिष्ट्यांमुळे, जगा वेगळी ठरतात. त्याचप्रमाणे आध्यात्म, संत साहित्य आणि भागवत धर्माचा प्रसार करण्यासाठी, कीर्तन-प्रवचनाचा उपयोग करून, आपल्या कर्तृत्वाने, वक्तृत्वाने आणि नेतृत्वाने नावलौकीक पाठवलेले व्यक्तिमत्त्व, म्हणजे बाबामहाराज. महाराष्ट्रच नाही, तर देश आणि देशाबाहेरही ज्यांनी, भागवतधर्माची भगवी पताका आजही फडकत ठेवली आहे, ते बाबामहाराज सातारकर, म्हणजे चालतं बोलतं संस्कारपीठच आहे. त्यांच्या वागण्यात शालीनता, बोलण्यात माधुर्य आणि नजरेत ममत्व भरलेलं आहे. त्यांच्या मुखातून येणारा प्रत्येक शब्द पवित्र आणि वाक्य सुवचनच असतं. ज्यांच्या मनात सकारात्मकतेचा थोडाही अंश असेल, अशा माणसाने बाबा महाराजांचे कीर्तन प्रवचन ऐकलं, तर त्याच्या मनावर अध्यात्मिक भक्तीचं पीक आल्याशिवाय राहणार नाही. अशा या पूजनीय महान कीर्तनकारायला भेटण्याचा, ऐकण्याचा आणि त्यांच्या माध्यमातून पांडुरंगाशी जुळण्याचा, मला अनेकदा योग आला. त्यांच्या किर्तनाचे वृत्तांकनही मी बऱ्याचदा केले. जे त्यांना मनापासून आवडले. त्याचे त्यांनी जाहीर कार्यक्रमात कौतुक करून, पाठीवर आशीर्वादाची थापही दिली. ते क्षण मला कृतकृत्य करून गेले. त्या आठवणींना, अत्तराचे मोल आले. जेव्हा जेव्हा मी, त्या आठवणीत डुबकी मारतो, तेव्हा तेव्हा मी बाबामहाराजांना माझ्या सानिध्यात अनुभवतो. भगवत भक्तीच्या परीमळामध्ये मी धुंद होतो. माझ्या भाग्याचा मलाच हेवा वाटायला लागतो.**



हभप. बाबामहाराज सातारकरांचे कृपाशीर्वाद स्वीकारताना. सोबत बंधू भरतकुमार चौधरी.

१९८८ साली मी पुण्याला काही कामानिमित्त गेलो होतो. कामं आटोपून, परतीची गाडी रात्री बाराला होती. ते गणेशोत्सवाचे दिवस होते संध्याकाळी सात ते बारा असे पाच तास माझ्या हातात होते. मी पुण्यातील गणपती बघण्याचं ठरवून, एक रिक्षा भाड्याने घेतली. रिक्षावाल्याने मला सर्वप्रथम श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घडवण्यासाठी, त्या परिसरात नेलं. गणेशोत्सवानिमित्त भव्य आरास करण्यात आलेली होती. मोठ्या मैदानावर राजस्थान मधील हवामहल उभारण्यात आलेला होता. ती भव्य आरास, रोषणाई बघून माझे डोळे दिपून गेले. तोच माझ्या कानावर अतिशय मधुर आवाजातील टाळ, चिपळ्या आणि मृदूंगाच्या साथीने गायला जाणारा अभंग पडला. मी त्या वाणीने इतका प्रभावित झालो, की माझे पाय आपसूक त्या आवाजाकडे वळले. त्या वाणीत इतकी ताकत होती, की आरासीचं आकर्षणही, मला थांबवू शकले नाही. एका मोकळ्या मैदानात गेल्यावर, भव्य व्यासपीठावर एक तेजपुंज व्यक्ती किर्तन करताना मला दिसली. समोर हजारोच्या संख्येने बसलेला, तल्लीन झालेला श्रोतृवृंद बघून, त्यांच्या दिव्यत्त्वाची मला जाणीव झाली. मीही त्या गर्दीचा एक भाग झालो. देहभान विसरुन, दोन तास मी कीर्तन ऐकत होतो. विद्वत्ताप्रचूर, अभ्यासपूर्ण, सुसंस्कारी, भाषा आणि संत वचनांचा चपखल दाखला, हे त्या कीर्तनकारांचे वैशिष्ट्य होतं. कीर्तनात कुठेही बाष्फळ चर्चा नाही. कुणावर टीकाटिप्पणी नाही, श्रोत्यांना हसवण्यासाठी आचरट विनोद नाहीत की विक्षिप्त हावभाव, हातवारे नाहीत. जे होतं, ते गंगेच्या प्रवाहासारखं शांत, पवित्र, निर्मळ ! ते बाबामहाराज सातारकर होते. ही त्यांची आणि माझी प्रत्यक्षातली पहिली भेट. त्यांच्या दर्शनाने आणि किर्तनाने मी इतका प्रभावित झालो, की पुण्यातील इतर गणपती बघायचं मी विसरलोच. त्याच कार्यक्रमात बाबामहाराजांच्या अनेक कॅसेट्स मी विकत घेतल्या. आणि, ते माझे आणि कुटुंबियांचे आवडते कीर्तनकार झाले. त्या घटनेला आज तीस बत्तीस वर्ष झाली. तरीही, बाबा महाराजांच्या कीर्तनाचा मोह आम्हाला, अजूनही टाळता येत नाही. आजच्या घडीला कीर्तन हा प्रकार अतिशय सवंग झालेला असून, श्रोत्यांना हसवणं, एवढीच त्याची उपयुक्तता राहिलेली आहे, असं वाटावं इतका कीर्तनाचा दर्जा घसरला आहे. याला, काही सन्माननीय अपवाद आहेतच. त्यांचे प्रणेते म्हणून बाबा महाराज सातारकरांकडे बघता येईल.

बाबा महाराजांचे कीर्तनाचे वेड मला इतकं लागलं होतं, की मला शक्य होईल तिथं तिथं मी त्यांचे कीर्तन ऐकायला जाऊ लागलो. सोबत मातोश्रीही असायच्या. ९० च्या दशकात दूरदर्शनवर लागणारी त्यांची प्रवचनाला, म्हणजे पर्वणीच होती. आमच्या जिल्ह्यात आरसी बाफना ट्रस्टतर्फे, त्यांचा कीर्तन सप्ताह व्हायचा. त्याला मी आवर्जून उपस्थित राहत होतो. बाबामहाराज सातारकर धरणगावलाही येऊन गेले. तेव्हा शासकीय विश्रामगृहात त्यांची भेट घेवून, मी त्यांची प्रत्यक्ष मुलाखत घेतली होती. साहित्य कला मंचतर्फे त्यांचा सपत्निक सत्कारही करता आला. त्यांचे निस्सीम भक्त कैलास पाटील, यांच्यासाठी बाबामहाराज गाव पातळीवर पिंपळे येथेदेखील किर्तनाला येतात. त्या कार्यक्रमांनाही मी उपस्थित राहून, कीर्तनाचे दैनिकातून वृत्तांकन केले आहे. ते त्यांना दाखवले. महाराज ते वाचून प्रभावित झाले. खूष झाले. माझ्या लेखनाचे त्यांनी भरभरून कौतुक केलं. मी जे बोलतो, ते अतिशय प्रभावीपणे आपण मांडतात. मी न बोललेलंही, काही प्रासंगिक त्यात जोडतात. यावरून, आपला संत साहित्याचा अभ्यास असल्याचे दिसून येते. असं त्यांनी म्हटलं, ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट होती. आपल्या आयुष्याच्या ८६ वर्षात ८५ वारी करणाऱ्या, एका सत्पुरुषाच्या मुखातून आपल्या लेखनाचा कौतुक व्हावं, यापेक्षा मोठी गोष्ट कोणती असू शकते. तो त्यांनी मला दिलेला आशीर्वादच मी मानतो.

साताऱ्याच्या ज्ञानेश्वर गोरे आणि सौ लक्ष्मीबाई गोरे यांच्या पोटी निळकंठ यांचा जन्म झाला. हेच ते बाबामहाराज सातारकर. त्यांचे आजोबा दादामहाराज सातारकर, हे प्रसिद्ध कीर्तनकार होते. त्यांच्या घरात दीडशे वर्षांपासून कीर्तनाची परंपरा आहे. आणि, एकशे एक वर्षाची दिंडीची परंपरा आहे. बाबामहाराजांनी दहावीपर्यंत इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतले असून, घरातील वारकरी संप्रदायाचा त्यांच्यावर प्रभाव पडला. काही काळ फर्निचर व्यवसाय करून त्यांनी स्वतःला पूर्णवेळ किर्तन परंपरेशी जोडून घेतले. आपण जे कीर्तन प्रवचन करतो, आपल्या मुखातून जी अभंगवाणी बाहेर पडते, त्यासाठी प्रचंड साधना केलेली असली तरी, ती आपल्या पूर्वजांची देणगी असल्याचं ते मानतात. पांडुरंगाचे कृपादृष्टी आपल्यावर असल्यामुळेच, आपण आजही कीर्तन प्रवचन करत आहोत, असं ते सांगतात. वारी आणि कीर्तन हा एक संस्कार आहे. परंपरा आहे. म्हणून, त्यांना मर्यादा पण आहेत. वारकऱ्यांच्या जीवनामध्ये आचार, विचार आणि संस्कारांना खूप महत्त्व असतं, असं ते आपल्या कीर्तनातून नेहमी सांगत असतात. वारी आणि किर्तनाच्या माध्यमातून आपण ईश्वराशी एकरूप होऊ शकतो, अशी त्यांची धारणा आहे. कीर्तनात हल्ली अभंगाचे निरुपण सोडून, इतर गोष्टींवर खालच्या पातळीवरचे विनोद करून, श्रोत्यांना हसवण्याची स्पर्धाच लागलेली आहे. त्याबाबत बोलताना बाबामहाराज म्हणतात, किर्तनाला वैभवशाली परंपरा आहे. कीर्तनात विनोद असला पाहिजे. मात्र, विनोदांचंच कीर्तन होऊ नये, अशी अपेक्षा ते व्यक्त करतात. आज वयाची ८६ वर्षे पूर्ण करत असतांनाही, त्यांची वाणीत बाष्फळ विनोद येत नाही.

परमार्थ ज्येष्ठ नागरिकांनीच करावा का ? याबाबत ते म्हणतात, परमार्थाला वयाचं बंधन नाही. परमार्थ हा संयम शिकवतो. ज्या वेळेस आपली सर्व अवयव गलितगात्र होतील, त्यावेळेस आपण परमार्थाकडे वळलो, तर त्यात काय अर्थ ? तरुण वय हे तरुन जाण्याचं वय असतं. त्यावेळेस जर आपण अध्यात्माकडे वळलात, तर मानवी जीवनाचं सार्थक होईल, असा संदेश देतात. वारीमध्ये एकाच वेळेस लाखो भाविक आलेले असतात, त्यातील काही हवसे, नवसे आणि गवसे वदेखील असतात. मात्र, जो मनाने निर्मळ होऊन येतो, तोच वारकरी असतो. महाराज जत्रा, यात्रा आणि वारी यातील फरक अतिशय सोप्या भाषेत समजावून सांगतात. बाजारासारखी खरेदी ज्या ठिकाणी करता येते, ती जत्रा. पाप धुण्यासाठी जी केली जाते, ती यात्रा. आणि, परमेश्वराशी एकरूप होण्यासाठी जी केली जाते, ती वारी असते. असं महाराज म्हणतात. भोगण्यासाठी, पापक्षालन करण्यासाठी जत्रा आणि यात्रा असतात. तर, भगवंताला भक्ताची भेट घालून देण्यासाठी, वारी असते. इतकं सहज, वारीचे महत्त्व ते पटवून देतात.

परमार्थ करण्यासाठी, संसार सोडायलाच पाहिजे अशी अट नाही. उलट संसारात राहून, परमार्थ करण्याची संधी वारीत भेटते. बाबामहाराजांनी आपल्या पत्नी सौ रुक्मिणीबाईंसोबत परमार्थाची वाटचाल केली. त्यांना भगवती, राजेश्वरी, आणि चैतन्य अशी तीन मुले. त्यापैकी चैतन्यचा मृत्यू झाला असून, त्यांचा वारसा भगवतीताई आणि त्यांचा नातू चिन्मय समर्थपणे चालवत आहेत. बाबामहाराजांचे श्रीक्षेत्र दुधीवरे येथे, श्री चैतन्य अध्यात्मिक ज्ञान प्रसार संस्था असून, श्री बाबामहाराज सातारकर ज्ञानपीठ प्रतिष्ठान देखील आहे. या माध्यमातून ते दरवर्षी आळंदी ते पंढरपूर, अशी वारी करत असतात. यात हजारो वारकरी सहभागी होतात. सुरुवातीच्या काळी एका तंबूपासून सुरू झालेली त्यांची वारी, ही शंभर तंबूंपर्यंत पोहोचलेली आहे. संत नामदेव, ज्ञानेश्वर माऊली, तुकोबा या संतांनी दिलेले ज्ञानामृत, ते आपल्या वाणीतून जनसामान्यांपर्यंत पोहोचवत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात किर्तनाचा प्रसार करताना, त्यांच्या कीर्तनाच्या कॅसेटनी विक्रम नोंदविलेला आहे. त्याबद्दल सरगम कॅसेट कंपनी तर्फे, त्यांना मानाची प्लॅटिनम डिस्क, राज्याचे राज्यपालांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले आहे. हा सन्मान प्राप्त ते एकमेव किर्तनकार आहेत.

भक्ती सगुण करावी की निर्गुण करावी ? या बाबत बोलतांना महाराज म्हणतात, ज्याला जी भावेल त्याने ती करावी. वारकरी संप्रदाय मात्र, सगुण आणि निर्गुण अश्या दोन्ही पध्दतीचा स्विकार करतो. असं ते म्हणतात. कारण सगुण, निर्गुण एकू गोविंद रे ! असं संतांनीच नमूद केलं आहे. निर्गण भक्ती ही देव असण्यावर विश्वास ठेवते. ती त्या भक्ताची खात्री असते. तर, सगुण भक्ती हि देव दिसण्यावर विश्वास ठेवते. त्यात त्यांना सुख मिळते. वारकरी या दोन्हीत तल्लीन होतो. देवाचं नाव घ्यायलाच हवं का.? या प्रश्नावर ते मार्मिक उत्तर देतात. ते म्हणतात, तुम्ही देवाचं नाव घ्या किंवा घेवू नका, काही फरक पडणार नाही. तो परमेश्वर तुमचं सतत नाव घेत असतो. म्हणून तर तो तुम्हाला रोज झोपेतून उठवतो. ज्या दिवशी त्याला तुमच्या नावाचा विसर पडेल, त्या दिवशी तुम्ही झोपेतून उठूच शकणार नाही. तो सर्वांवर आईसारखं प्रेम करतो. आई प्रत्येक लेकराला समान माया करते. तसं, भक्ती करण्याचा इथं सर्वांना अधिकार आहे.

सकळाशी आहे, येथे अधिकार,<br>
कलीयुगे उध्दार, हरिच्या नामे.

हे चरण आपल्या संविधानाशी बांधिलकी सांगतं. म्हणून पूर्वीच्या काळी संत वचनांना लोकमान्यता होती. भक्ती ही प्रदर्शनाची गोष्ट नाही. ती दर्शनाची वाट आहे. प्रदर्शन ताठ राहून बघावं लागतं. दर्शनासाठी विनम्र व्हावं लागतं. विनम्रतेचा हा त्यांचा संदेश, समस्त मानव जातीच्या कल्याणाचा मार्ग आहे, असं मला वाटतं.

पवित्र ते कूळ, पावन तो देश,<br>
जेथे हरिचा दास, जन्म घेतो.

अश्या हरिदासांमध्ये बाबामहाराज सातारकरांची गणना होते. त्याचं सानिध्य, स्नेह, प्रेम भाग्यानेच लाभते. जे मला लाभले. या बाबत मी स्वतःला भाग्यवान समजतो. त्यांच्यातील सद्गुण, आपल्या जगण्याचे अविभाज्य घटक व्हावेत, हीच त्या परमपित्या पांडुरंग चरणी प्रार्थना.!

## सेलूतील बहुचर्चित जुगार अड्ड्यावर छापा

आधुनिक केसरी न्यूज

**सेलू :** शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळील, गोविंदा लॉजच्या तळमजल्यात लोकरत्न सेवाभावी संस्थाच्या हॉलमध्ये, गेल्या काही वर्षांपासून दिवसरात्र खुलेआम सुरू असलेल्या बहुचर्चित जुगार अड्ड्यावर, पोलिसांनी रविवारी रात्री साडेनऊच्या सुमारास धाड टाकली. २० जुगाऱ्यांना ताब्यात घेतले असून, रोख रक्कमेसह ३ लाख ४६ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

सहाय्यक पोलीस अधीक्षक अविनाश कुमार व पोलीस निरीक्षक रावसाहेब गाडेवाड यांच्या पथकाने ही कारवाई केली. गोविंदा लॉजच्या तळमजल्यात लोकरत्न सेवाभावी संस्थेच्या कार्यालयावर धाड टाकली. येथील हॉलमध्ये २० व्यक्ती ४ गोलाकार टेबलवर तिरट नावाचा जुगार खेळत होते. पोलिसांनी २० जणांना ताब्यात घेतले आहे. तर ५० हजार ४५० रोख, १७ मोबाईल, ८ दुचाकी असा एकूण ३ लाख ४६ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. २१ आरोपींविरुद्ध सोमवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुगार अड्ड्याचा चालक-मालक भाऊराव विठ्ठलराव सोनवणे (रा.सेलू) वगळता, वीस आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. अशी माहिती पोलीसांनी दिली. सहायक पोलिस निरीक्षक जटाळ पुढील तपास करीत आहेत.

ताब्यातील आरोपींची नावे अशी : शिरीष नारायण पांडे, विठ्ठल गंगाधर आकात, सुनिल माणिकराव राजुरकर, गणेश दत्तराव सवने, सुनिल अंकुश टाके, शिवाजी बाबूराव खेडकर, बाबासाहेब मुंजाजी मोळे, अशोक गुलाबराव खुपसे, दिगंबर गोविंद शेरे, उत्तम काशिनाथ डंबाळे (सर्व रा.सेलू), भारत रावसाहेब घाटगे, शेख जाफर शेख उस्मान, लक्ष्मण भागवत खंडीग, मनसब मो.सुलतान, मतीन खान चांदखान, विनोद सोपानरा इब्राहीम खान अमानउल्ला खान, शेख बडेखाब शेख कासीम (सर्व रा.परभणी), बबन कचरूबा शिरसाट, दिनकर विनायकराव सोळंके (रा.कुपटा). दरम्यान, पंधरा दिवसांपूर्वीच सेलूतील साई सेवाभावी संस्थेच्या खोल्यातील जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकून २५ लाखांच्या मुद्देमाल जप्त करीत, ४४ जणांना ताब्यात घेतले होते.

## केदारनाथमध्ये ब्लॉगर आणि युट्यूबरवर बंदी घालणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**देहरादून :** या वर्षीची चारधाम यात्रा सुरू होऊन तीन आठवडे झाले आहेत. सोशल मीडियावरही केदारनाथ व बद्रिनाश यात्रा ट्रेंड करत आहे. केदारनाथमध्ये भाविकांसोबतच युट्यूबर आणि व्लॉगर यांची गर्दी सध्या वाढत चालली आहे. ज्यामुळं चार धाम यात्रेत अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यावर आता मंदिर प्रशसनाने कठोर निर्णय घेण्याचा इशारा दिला आहे.

उत्तराखंडमध्ये चार धाम यात्रेच्या निमित्ताने भाविकांची झुंबड उडाली आहे. यात सर्वात जास्त भाविक केदारनाथ यात्रेत सहभागी झाले आहेत. यात युट्यूबर आणि ब्लॉगरही मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. सरकारी अकड्यानुसार, गंगोत्री, यमुनोत्री बद्रीनाथच्या तुलनेत केदारनाथ जाणाऱ्या भाविकांची संख्या अधिक आहे. त्यामुळेच केदारनाथ सोशल मीडियावर टॉप ट्रेंड होत आहे. धार्मिक स्थळ हे टीआरपी मिळवण्याचे एक साधन झाल्याची भावना व्यक्त होत आहे. धार्मिक स्थळी येणाऱ्या युट्यूबर्स आणि ब्लॉगरमुळं समस्या निर्माण होत असल्याचे म्हटले आहे. बद्री केदार समितीचे अध्यक्ष अजेंद्र अजय यांनी दिलेल्या माहितीनुसार, चार धाम यात्रेत निर्माण होणाऱ्या समस्या पाहता बद्रीनाथसोबतच केदारनाथमध्येही युट्यूबर आणि ब्लॉगर्सना बॅन करण्याचा विचार करण्यात येत आहे. दरम्यान, गेल्या काहि दिवसांपासून सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. या व्हायरल व्हिडिओत एक व्यक्ती आपल्या पाळीव कुत्र्यासह केदारनाथच्या दर्शनासाठी घेऊन गेला होता. तो कुत्रा केदारनाथ मंदिराच्या समोरील नंदीसमोर डोके टेकवून नमस्कार करतो तर पंडितही त्या कुत्र्याला टिळा लावत आहेत. या व्हिडिओवर सोशल मीडियावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया समोर येत होत्या. काहींनी या व्हिडिओला ट्रोल केले आहे. या प्रकरणानंतर मंदिर समितीने यावर कठोर पावले उचलणार असल्याचे म्हटले होते.

चारधाम यात्रेला ३ मे रोजी गंगोत्री आणि यमुनोत्रीची कपाटे उघडल्यानंतर सुरुवात झाली. केदारनाथ आणि बद्रीनाथ मंदिरांची कपाटे उघडल्यानंतर यात्रेतील भाविकांची गर्दी आणखी वाढली. करोनाचे निर्बंध हटविल्यानंतर दोन वर्षांनी ही यात्रा होत असल्यामुळे सरकारनेही काही नियम शिथिल केले.

# बँक कर्मचाऱ्यांनी आपल्या न्याय्य हक्कांसाठी युनियनच्या झेंड्याखाली एकत्र यावे : आनंदराव अडसूळ

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** बँक कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध न्याय मागण्यासाठी, भावी आयुष्यासाठी, सार्वजनिक विकास व त्यांना स्थिरस्थावर करण्यासाठी आपण प्रयत्नशील असून आपण को.ऑप.बँक एम्प्लॉईज युनियनच्या झेंड्याखाली एकत्रित यावे, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष शिवसेना नेते आनंदराव अडसूळ यांनी केले.

कोल्हापूर येथे सहकारी बँक कर्मचाऱ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते अध्यक्षपदावरून बोलत होते. प्रमुख उपस्थित म्हणून कार्याध्यक्ष नरेंद्र सावंत, सल्लागार सुनिल साळवी, सरचिटणीस प्रदिप पाटील प्रमुख उपस्थितीत होते.

यावेळी बोलताना अडसूळ यांनी, नोकरी लावली म्हणून तुम्ही कोणाचे गुलाम होऊ नका. कामाचा योग्य दाम आणि घामाचा सन्मान करण्यात आला पाहिजे यासाठी आमचा लढा असून बँकेच्या हिताला बाधा येईल अशी आमची कधीच मागणी नसते.




यासाठी युनियन महत्वाची असून तुम्ही सहभागी व्हावे असे आवाहन केले.

युनियनचे कार्याध्यक्ष नरेंद्र सावंत यांनी, आपल्या युनियन मध्ये कोणत्याही प्रकारचे जात, धर्म पंथ, पक्षभेद विसरून सर्व जण एकाच झेंड्याखाली एकत्र येऊन कर्मचाऱ्यांना न्याय देण्याचे काम करतात.भविष्यात जिल्ह्यातील सर्व बँक कर्मचाऱ्यांनी युनियनमध्ये सहभागी व्हावे असे सांगितले. यावेळी सल्लागार सुनिल साळवी, किरण अतिग्रे यांची भाषणे झाली.

या कार्यक्रमात अपना बँकेचे व्यवस्थापक रोलँड रिबेरो यांचा सलग तीन वर्षे पारितोषिक मिळालेबद्दल अडसूळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच भुविकास बँक कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्या मान्य झाल्याबद्दल व यासाठी प्रयत्न केलेबद्दल माजीमंत्री आनंदराव अडसूळ यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी स्वागत उपाध्यक्ष अनिल पोवार यांनी केले. प्रास्ताविक संजय साळोखे यांनी केले. यावेळी सरचिटणीस मनोहर दरेकर, दिपक पाटील, आजरा बँकेचे व्यवस्थापक प्रविण कापसे, एम.पी. पाटील, युनियनचे मुंबईमधील पदाधिकारी, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक बँकांचे प्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन भरत जाधव यांनी व आभार राहुल दुकांडे यांनी मानले.



## आघाडी सरकारच्या विरोधात धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाबाबत महा विकास आघाडी सरकार - गेली दोन वर्षापासन निष्काळजीपणे झाकपणे दुर्लक्ष करीत असून यामुळे महाराष्ट्रातील समाजावर झालेल्या अन्याय परंतु मध्यप्रदेश सरकारने योग्यता इम्पीरियल डाटा न ट्रियन टेस्ट केल्यामुळे मध्य प्रदेश सरकारमा राजकीय आरक्षण पूर्व करण्यात आले परंतु आमचे महाराष्ट्राचे तीन ठोबाच्या सरकार यांना ओबीसी समाजाला राजकीय आरक्षणापासून दूर ठेवण्यासाठी त्यांची काम करण्याची नकारात्मकता पाहता दिनांक 23 रोजी जिल्हाधिकारी कचेरी क्यूमाईन क्लब समीर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

दुपारी 11 ते 3 यावेळी खासदार डॉ.बाबासाहेब भामरे, माजी मंत्री जयकुमार रावल, आमदार अमरीश भाई पटेल, आमदार काशिरामजी पावरा, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, जिल्हाध्यक्ष अनुप अग्रवाल, ग्रामीण जिल्हाध्यक्ष नारायण पाटील, माजी महापौर प्रदीप कर्पे, भाजी महपौर चंद्रकांत बोनार, जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. सुधार रांधे, प्रदेश उपाध्यक्ष अवन चौधरी, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष हिरामण गवळी, प्रदेश चिटणीस पैशाली शिरसाट, सभापती शितलभाऊ नवले, उपमहापौर अनिल नागमोडे, जि.प. सभापती कुसुमताई निकम, सर्व नगरसेवक, सर्व जिल्हा परिषद सदस्य, याचे उपस्थितीमध्ये या आंदोलनात भाजपप्रणीत सर्व आपाटी मोर्चा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते, अशी माहिती ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष दिनेश बागुल, युवा अध्यक्ष विकी परदेशी, ग्रामीण जिल्हाध्यक्ष आर.के. माळी यांनी दिली.

## जनजाती समाजाचे हिंदू संस्कृतीत महत्त्वाचे योगदान : रामचंद्र खराडी

आधुनिक केसरी न्यूज

**मुळशी :** जनजाती समाज हा मूलतः हिंदू आहे, त्यांचे हिंदू संस्कृतीत महत्वाचे योगदान आहे, त्यांचा हिंदू म्हणून विकास केला पाहिजे, असे प्रतिपादन रामचंद्र खराडी यांनी केले.

वनवासी कल्याण आश्रमाच्या माले येथील समाज कल्याण केंद्राचे उदघाटन 22 मे रोजी झाले. त्यावेळी ते बोलत होते. वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र ही संस्था महाराष्ट्रातील जनजाती समाजासाठी विविध सेवाकार्ये करीत आहे. मुळशी तालुक्यात मोठ्या संख्येने कातकरी समाज राहतो. मजुरीवर गुजराण करणाऱ्या या समाजात शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. त्यामधून गरिबी वाढत आहे. त्यांच्या विकासासाठी एक केंद्र सुरू करण्याचे आश्रमाने ठरवले आणि तत्कालीन अध्यक्षा अंजलीताई घारपुरे यांच्या नेतृत्वात 2016 साली माले गावामध्ये एक वसतिगृह सुरू केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, डॉ. दबडघाव यांनी कल्याण आश्रम ही एकमेव संस्था जनजाती समाजाच्या संस्कृतीवरील आक्रमण, जबरदस्ती धर्मबदल या विषयावर काम करते असे सांगून जनजाती समाज हा मूलतः हिंदू आहे, त्यांचे हिंदू संस्कृतीत महत्वाचे योगदान आहे, त्यांचा हिंदू म्हणून विकास केला पाहिजे असेही प्रतिपादन खराडी यांनी केले.

यामध्ये मुळशी तालुक्यातील राष्ट्रीय सर्वांगीण विकास संस्थेने यामध्ये मोलाचे सहकार्य केले. भाड्याच्या छोट्या जागेत उत्तम रीतीने चाललेल्या या संस्थेला स्वतःची वास्तू मिळावी यासाठी पुण्यातील रोहन बिल्डर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेने मदतीचा हात पुढे केला आणि दोन वर्षांत एका अप्रतिम वास्तूची निर्मिती केली.

२२ मे रोजी या नूतन वास्तूचे उद्‌घाटन आश्रमाचे अखिल भारतीय अध्यक्ष रामचंद्रजी खराडी यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, माले गावाच्या सरपंच सोनालीताई शेंडे, रोहन बिल्डर लुंकड तसेच, कातकरी बंधू भगिनी मोठ्या संखेने उपस्थित होते. कल्याण आश्रमाचे मुळशी तालुका अध्यक्ष वसंत वाघमारे आणि सचिव सागर काटकर हेही यावेळी उपस्थित होते.

तालुक्यातील आदिवासी जनतेसाठी हे केंद्र विकासाचा आधार होईल अशी आशा उपस्थित कातकरी बांधवांनी व्यक्त केली. पालघर तालुक्यातील जनजाती तारपा नृत्य, कुलाबा जिल्ह्यातील कातकरी भजनी मंडळ, मुळशी तालुक्यातील पोवाडा असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम या निमित्ताने सादर करण्यात आले. विशाल भुरुक यांनी गीत सादर केले. सूत्रसंचालन नारायण ठिकडे आणि सचिव विजय भालिंगे यांनी तर आभार उपाध्यक्षा अंजली चिंचोळकर यांनी मानले. शर्मिला शिंदे यांनी पसायदान म्हटले. सर्व मान्यवरांचा भारत मातेची प्रतिमा आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचा परिणाम म्हणून आपली मुले मुली या वसतिगृहात पाठविण्यास अनेक पालकांनी उत्सुकता दाखवली.

माले गावाच्या वैभवात या वास्तूमुळे भर पडली आहे, असे प्रतिपादन सुहास शेंडे आणि अन्य ग्रामस्थांनी केले आणि आश्रमाच्या कामात सदैव सहाय्य करण्याची भावना व्यक्त केले. नाशिक जिल्ह्यातील जनजाती बांधवांचा नैसर्गिक आम्बा, मध यावेळी विक्रीस ठेवण्यात आला होता. वसतिगृह पूर्ण झाले असून मुलामुलींच्या प्रवेशाची प्रक्रिया लवकरच सुरू होत आहे, पालकांनी संपर्क करावा, असे आवाहनही संस्थेने केले आहे.




## तालुका कृषि अधिकारी कार्यालयात कृतीसंगम कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सोयगाव येथे तालुका कृषि अधिकारी कार्यालाय सोयगाव येथे कृषि पायाभूत सुविधा निधी योजनेची कृतीसंगम कार्यशाळा दि.२० रोजी एस.बी.पवार तालुका कृषि अधिकारी, सोयगाव यांच्या मार्गदर्शनाखाली व एस.जी.वाघ (मंडळ कृषि अधिकरी बनोटी) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदरील कार्यशाळेत पोक्रा व स्मार्ट प्रकल्पाची माहिती एस.जी.वाघ यांनी दिली तसेच कृषि पायाभूत सुविधा निधी योजनेची या विषयीची माहिती ए.एस.महाजन यांनी दिली. आजच्या कार्यशाळेस बँक ऑफ महाराष्ट्र सोयगांव व फर्दापूर, महाराष्ट्र ग्रामीण बँक जरंडी तसेच औ. जि. म. बँक सोयगाव यांचे शाखा प्रमुख, महिला व प्रगतिशील शेतकरी, कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी तसेच पंचायत समिती कृषि विस्तार अधिकारी व उमेद अभियानाचे प्रमुख उपस्थित होते, अशी माहिती कृषी पर्यवेक्षक अमोल पाटील यांनी बोलताना सांगितले.

## जात्यावरच्या ओव्या काळाच्या पडद्याआड; संस्कृतीचा विसर

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात संस्कृतीचा विसर पडत चाललेला आहे.'दळण दळते जना जात्यावर ज्वारी, गाईन गुण मी देवा ये तू माझ्या दारी, पूर्वी महिला हे गाणं पहाटेच्या वेळी जात्यावर बसून दळण दळताना म्हणायच्या, पण एकविसाव्या शतकात वाटचाल करताना अनेक भारतीय जुन्या रूढी, परंपरा व संस्कृतीचा विसर पडला आहे. याचबरोबर जात्यावरील गाणीही आता पडद्याआड चालली आहेत. ग्रामीण भागात जात्यावरील गाणी लोकप्रिय होती. पहाटे उठून महिला जात्यावर दळण दळताना गाणी म्हणत असत. त्या काळात वीज नव्हती. साहजिकच पिठाच्या गिरण्याही नव्हत्या. अशावेळी महिला आपल्या घरातील दळण जात्यावर दळत होत्या. जात्यावर दोन किंवा तीन महिला बसून एकावेळी ४ ते ५ पायल्या धान्य सुमारे दोन तासांत दळत होत्या.

ग्रामीण भागात हे दृश्य असायचे घराघरांतून निघणारा धूर. मध्येच कोंबड्याचे आरवणे या सर्व गोष्टी म्हणजे ग्रामीण भागातील वगेळे जीवन होते, असे अनेक जण सांगतात.तो काळ वेगळा होता. आता सगळं काही बदललं बाबा त्या वेळची जात्यावरची गाणी सुरात, मधूर आवाजात असायची. आजची कसली आलीत गाणी, नुसता धांगडधिंगा, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ माहिला ग.भा. सुलोचनाबाई साहेबराव चव्हाण यांनी व्यक्त करतात. त्या म्हणतात की त्या काळातील गोष्ट काही औरच. एक रूपया खिशात असला की समदा बाजार पिशवी भरून यायचा. आता शंभर रूपयात पिशवीचा कोपरा भरत नाय, हळूहळू काळ बदलला इंजनावरील पिठाच्या गिरण्या सुरू झाल्या. गिरणी सुरू आहे हे ओळखता यावे, म्हणून इंजिनच्या धुराच्या नळकांडीवर डबा बांधत असत. त्याचा पूकपूक आवाज आला की पिठाची गिरण चालू आहे, असे ओळखायची नंतर गावात इलक्ट्रिक पिठाच्या गिरण्या झाल्या आणि जाती बंद पडली. पार कोपऱ्यात जाऊन पडली. जात्यावरील गाणी बंद पडली. आधुनिक युगाकडे झेपावताना भारतीय संस्कृती, कला मागे पडून पाश्च्यात्य धुंद संगीत सुरू झाले. त्यामुळे सावळदबारा ग्रामीण भागातील कला आता संपुष्टात आली आहे अशा ज्येष्ठ महिला ग.भा.सुलोचनाबाई चव्हाण यांनी दै.अधुनिक केसरीचे प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.



# आता आंबेडकरवाद नव्याने सांगण्याची गरज : डॉ.बबन जोगदंड

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** वामनदादांनी पायी प्रवास करून गाण्यांच्या माध्यमातून समाजात आंबेडकरवाद रुजविला. काही लोक बाबासाहेब म्हटलं की प्रसंगी जीव द्यायला तयार होतात तर काही आंबेडकरी विचारांपासून कोसो दूर आहेत. त्यांना प्रवाहात आणण्यासाठी आंबेडकरी पायवाटेवर प्रयत्न करण्याची गरज आहे. त्याचबरोबर त्यांचे प्रबोधन करण्याची गरज आहे. आज आंबेडकरी युवक धम्म चळवळीपासून, आंबेडकरी विचारांपासून दुरावत चालला आहे. अशा युवकांना आता आंबेडकरवाद नव्याने सांगण्याची गरज असल्याचे प्रतिपादन महाकवी वामनदादा कर्डक जन्मशताब्दी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. बबन जोगदंड यांनी केले.

यावेळी सिने अभिनेते उद्घाटक मिलिंद शिंदे, जीवन गौरव पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ नाटककार प्रा. दत्ता भगत, आंबेडकरी चळवळीतील व्याख्यात्या सुषमा अंधारे, भदंत पंय्याबोधी थेरो, महापौर जयश्री पावडे, ज्येष्ठ साहित्यिक अनुरत्न वाघमारे, दशरथ लोहबंदे, उद्योजक गजानन मुधोळ, भीमराव हटकर, स्वागताध्यक्ष बालाजी इबितदार, निमंत्रक जी.पी. मिसाळे, संयोजन समितीचे अध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, राज गोडबोले, कोंडदेव हटकर आदींची उपस्थिती होती.

सत्यशोधक फाऊंडेशन आणि मानव विकास संशोधन सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील कुसुम सभागृहात



महाकवी वामनदादा कर्डक जन्मशताब्दी वर्षाच्या औचित्याने साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संमेलनाचे उद्घाटन भारतीय सिने अभिनेते मिलिंद शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले. अध्यक्ष पदावरून पुढे बोलताना डॉ. जोगदंड म्हणाले की, आंबेडकरोत्तर काळात आंबेडकरी चळवळ गतिमान करण्याचे काम वामनदादांनी केले. या चळवळीत आपण सर्वांनी सहभागी होणे आवश्यक आहे. जे बाबासाहेबांच्या पुण्याईने गर्भश्रीमंत बनले, मोठ्या हुद्द्याच्या जागा पटकावल्या पण यापैकी जे सामाजिक योगदान देत नाहीत कारण ते सुप्तावस्थेत आहेत. अशांमध्ये जागृतीचा अंगार पेटविण्याची गरज आहे. ती आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आहे असेही ते म्हणाले. यावेळी ज्येष्ठ नाटककार प्रा. दत्ता भगत यांना साहित्य संमेलन संयोजन समितीच्या वतीने जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्रा. भगत यांना प्रदान करण्यात आलेल्या मानपत्राचे वाचन संयोजन समितीचे अध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे यांनी केले.

उद्घाटन सत्रातच सत्यशोधक समाजभूषण पुरस्कार, फुले आंबेडकरी विचारधारा पुरस्कार आणि दशकातील आंबेडकरी जलसाकार पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

सूत्रसंचालन भीमराव हटकर यांनी केले तर आभार राज गोडबोले यांनी मानले. या सत्राच्या यशस्वीतेसाठी अशोक मल्हारे, प्रभू ढवळे, एन. टी. पंडित, संजय जाधव, नितीन एंगडे, डॉ. राम वनंजे, राहुल गवारे, शंकर गच्चे, बाबुराव पाईकराव, प्रशांत गवळे, रणजीत गोणारकर, नागोराव डोंगरे यांनी परिश्रम घेतले.

### सांस्कृतिक चळवळीतून समाजसेवा : मिलिंद शिंदे

**सिनेमा हे मानवी जीवन जाणिवांचे सांस्कृतिक क्षेत्र आहे. सिनेमाच्या माध्यमातून समाजसेवा करण्याचा माझा नेहमीच प्रयत्न झालेला आहे. देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत राहण्यासाठी कलावंत तत्पर असतात. त्यामुळे कलेच्या क्षेत्रात राहून जे चांगले करता येईल ते मी करीत राहीन, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.**

# पत्रकाराला जिवे मारण्याची धमकी; ९ जणांवर गुन्हे दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूर तालुक्यातील पत्रकाराला त्याच्याच दुकानात जावून धमकविल्याचा प्रकार गेल्या १० मे रोजी सायंकाळी घडला. एवढ्यावर हे थांबले नाही तर दुकानाचे कुलूप तोडून ताबा घेण्यासह पत्रकाराला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. हा त्रास वाढत जाणारा असल्याने अखेर काल पोलिसात तक्रार करण्यात आली. त्यानुसार नऊ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत भारतीय पत्रकार संघाचे उपाध्यक्ष असलेल्या गोपाल कन्हैय्यालाल मारवाडी यांनी पोलिसात फिर्याद दिली असून दि. १० मे रोजी सायंकाळी पावणे सहाच्या सुमारास निश्चय योगेंद्र ललवाणी किरण पांडूरंग मराठे, भरत देविदास करनकाळ, गौरव सुभाष बडगुजर व पंकज ईश्वर मराठे असे पाच जण दुकानात घुसले आणि त्यांनी शिवीगाळ सुरू केली. तुझा लहान भाऊ हरिलाल व त्याचे कुटुंबिय कुठे आहेत? त्यांचा ठावठिकाणा सांग नाहीतर तुला व तुझ्या कुटुंबियांना जीवे ठार मारू. असे म्हणत भावाने घेतलेले पैसे व्याजासहीत न दिल्यास दुकानाचे कुलूप तोडून ताबा घेण्याची धमकी त्यांनी दिली. इतकेच नव्हे तर तु नेहमी अवैध सावकारी व इतर धंद्यांबाबत पेपरात बातमी छापतो असे म्हणत धमकविण्यात आले सुमारे तासभर हा धिंगाणा सुरू होता. त्यानंतर त्याच दिवशी रात्री पावणे आठच्या सुमारास रोहित भोई त्याच्या सोबत अन्य दोघा तिघांनी दुकानात घुसून शिवीगाळ केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. मुळात भावाने घेतलेले सर्व पैसे संबंधितांना परत केले आहेत, असे त्याचे म्हणणे आहे आणि या लोकांच्या भीतीपोटीच त्याने कुटुंबियांसह घर सोडले आहे.

त्यामुळे हे लोक आता आपल्याला त्रास देत असून त्यांच्यापासून जीवीताला धोका निर्माण झाल्याचे गोपाल मारवाडी यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे. या फिर्यादीची दखल घेत पोलिसांनी निश्चय ललवाणी (जैन) सह नऊ जणांवर गुन्हा दाखल केला असून तपास सुरू झाला आहे.

# भ्रष्टाचाराच्या विषयाच्या बैठकीत हाणामारी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शासकीय विश्रामगृह याठिकाणी भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत एकत्र बैठक पार पडत असताना व पदवीधर मतदार नोंदणी सुरू असताना भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये वाद निर्माण होऊन झटापट झाल्याने भाजप मधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. पदवीधर मतदार नोंदणीचा कार्यक्रमादरम्यान भाजपच्या पदाधिकाऱ्यांना भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. भाजपचे जिल्हा सरचिटणीस शैलेश आजगे यांना साक्री येथील शासकीय विश्रामगृह याठिकाणी पक्षाच्याच 20 ते 25 कार्यकर्त्यांनी भ्रष्टाचार विरोधात बोलतो म्हणून कार्यक्रमादरम्यान मारहाण केल्याचा आरोप आजगे यांनी लावला आहे. याबाबत साक्री पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येत असून या मारहाणीमुळे भाजपचा अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे.



# भारतीय पिछडा ओबीसी शोषित संघटनेचे समर्पित आयोगाला निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भारतीय पिछडा ओबीसी सोशीत संघटन नई दिल्ली च्या औरंगाबाद विभागाने औरंगाबाद येथे समर्पित आयोगाला ओबीसी राजकीय आरक्षणाच्या अनुषंगाने निवेदन सादर केले. यामध्ये मागासवर्गीय आयोगाने ज्या पद्धतीने UDISE आणि SARAL चा डेटा वापरून सर्वेक्षण केले आणि तो डेटा कोर्टाने स्वीकारला नाही तशा पद्धतीने सर्वेक्षण करू नये. कोणत्याही परिस्थितीत दुय्यम सोर्स च्या माहितीच्या आधारित अहवाल करून सादर करू नये. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात मागासवर्गीयांचे प्रतिनिधित्व व त्यांचे स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय प्रतिनिधित्व तपासण्यासाठी मतदार याद्या आधार मानून त्यानुसार संख्या निश्चित करून एकूण ओबीसीचे प्रमाण निश्चित करण्यात यावे. यासाठी स्थानिक कर्मचारी जसे तलाठी ग्रामसेवक व बूथ लेवल ऑफिसर्स च्या माध्यमातून अनुभवसिद्ध, समकालीन व कसून मिळवलेल्या माहितीच्या आधारेच अंतिम अहवाल तयार करण्यात यावा. प्राथमिक सोर्स वरील आधारित असलेला अहवाल तयार करण्यासाठी बी.एल.ओ. ची मदत घेऊन लोकल बोडीनिहाय ओबीसीच्या सदस्यांची संख्या आणि राजकीय मागासलेपण या संदर्भाने आकडेवारी गोळा करावी.

महाराष्ट्र सरकारने ओबीसींची जातनिहाय जनगणना तात्काळ करावी, बीएलओ च्या माध्यमातुन तात्काळ माहिती गोळा होऊ शकते तसे प्रयत्न करा, १९३१ इंग्रज सरकार जनगणना करु शकते भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार का करु शकत नाही, एस सी आणि एस टी ची जनगणना होते मग ओबीसी साठी एक कॉलम वाढवून जनगणना का केली जात नाही?, त्यासाठी सरकारने पुरेसे मनुष्यबळ व निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. इत्यादी मागण्या आपल्या निवेदनात मांडल्या आहेत.

या प्रसंगी संघटनेचे राष्टीय अध्यक्ष सत्वजी माचणवार, विभागीय अध्यक्ष प्रा.सुदाम चिंचाणे, महासचिव डॉ. कालिदास भांगे, डॉ. वसंत हारकळ, डॉ. प्रभाकर गायकवाड, डॉ. राजू पोपळघट, अमोल वाघमारे, डॉ. मनीषा वंजारी, डॉ. सुभाष जिते, मधुकर हिवाळे, शुभम गावंडे, डॉ. नवनाथ गोरे, पंढरीनाथ झगडे, दिलीप काठोडे, राजेश चिटकुलवार, सखाराम आव्हाड, कृष्णा हजारे, राजाराम शिंदे, जी.आर. बनसोडे, बळीराम चव्हाण, पंढरीनाथ गाडे इत्यादींची उपस्थित होती.



# झांबड इस्टेट येथे मोफत आरोग्य तपासणी व फिजिओथेरपी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आज क्रांती चौक वॉर्डमधील झांबड इस्टेट येथील श्री महाकलेश्वर, रेणुका माता मंदीर येथे सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल व झांबड इस्टेट परिवार तर्फे तसेच मा.नगरसेविका शिल्पाराणी सागर वाडकर यांच्या प्रयत्नातून मोफत आरोग्य तपासणी शिबिर आणि फिजिओथेरपी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी सुप्रतम हौसिंग सोसायटी चे अध्यक्ष मनोज सकलेचा, दिलीप देशमुख, सागर वाडकर, राधेश्याम तिवारी, खंडेलवाल काका, खैरनार काका, महेश जोशी, मनोज चावडा, सौ. रॉय, ललिता ब्रम्हेचा, तोतला भाभी, सेठ नंदलाल धूत हॉस्पिटलची टीम डॉ.रंगनाथ काळे, डॉ. श्रद्धा घडामोडे, मनीषा पाटील, अतिश दायमा, संदीप भिसे, श्रीराम दौड, रिलायव्हा फिजिओथेरपी युनिटचे डॉक्टर्स यांची उपस्थिती होती.



# लोणार अभयारण्यात १८६ वन्यप्राण्यांची नोंद



आधुनिक केसरी न्यूज

यासीन शेख

**लोणार :** जगविख्यात खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर येथे वन्यजीव विभागामार्फत अभयारण्यामध्ये प्राणी गणना करण्यात आली. यामध्ये १८६ वन्यप्राण्यांची नोंद झाली झाली. दोन वर्षापासून कोरोना काळामुळे वन्यजीव अभयारण्यामध्ये प्राण्यांची गणना झाली नव्हती. लोणार सरोवराला व परिसराला राज्यशासनाकडून वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले आहे. संपूर्ण परिसराला चोहोबाजूने तारेची कुंपण करून वन्यजीव अभयारण्यतील प्राण्यांना संरक्षण मिळाल्यामुळे अभयारण्यात विविध जाती प्रजातीचे पक्ष्यांची मोठ्या प्रमाणात वास्तव्य झाले आहे. वन विभागामार्फत कृत्रिम पाणवठे तयार करण्यात आले असून आठ वर्षापासून बंद पडलेला राम गया येथील झरा सुरू झाल्याने वन्यप्राण्यांना पाण्याची सोय झाली आहे. या पाणवठ्यावर १ बिबट,१०६ माकड, ६२ नीलगाय, २ सायाळ, ३८ मोर, ३४ रान डुक्कर असे एकूण १८६ वन्यप्राण्यांची नोंद घेण्यात आली आहे. यावेळी वनपाल एस .बी. नपते, वनरक्षक के. बी. सरकटे, जी. आर. शिंदे, एस .जे. माने, के. ई. नागरे व इतर वनमजूर उपस्थित होते.

# ‘क्रीडा भारती’च्या भारत परिक्रमेत खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी आणि देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन करण्या करिता आज देशभरात २२५ ठिकाणी एकाच वेळी ‘क्रीडा भारती’च्या माध्यमातून दुचाकी वाहन रॅली काढण्यात आली. औरंगाबादेत झालेल्या या रॅलीमध्ये २५० प्रशिक्षक आणि खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले.
सकाळी ९ च्या सुमाराला देशातील २२५ ठिकाणांहून ही रॅली एकाच वेळी काढण्यात आली. औरंगाबादेत अध्यक्ष पंकज भरसाखळे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या रॅलीची सुरुवात शहरातील भारत माता मंदिर येथे वंदन करून झाली. या रॅलीचा समारोप वेरूळ येथील शहाजी राजे जन्मस्थळ असलेल्या मालोजीराजे भोसले गढी येथे झाला.
क्रीडा भारतीचे अखिल भारतीय कोषाध्यक्ष मिलिंद डांगे, प्रसिद्ध बाधकाम व्यावसाईक डॉ. सुशील भारूका, इंजिनिअर संतोष पाठक, उद्योजक दिनेश गंगवाल यांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी मिलिंद डांगे म्हणाले, ‘ही रॅली तरुणाईला प्रोत्साहन देण्यासाठी आहे. या रॅलीच्या माध्यमातून त्यांच्या मनात स्वातंत्र्यसैनिकांप्रती असलेला अभिमान अजून वृद्धिंगत होणार आहे’. डॉ.सुशील भारूक म्हणाले, ‘आपल्या तरुणाईला देशातील स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्यप्रति माहिती होणे अधिक गरजेचे आहे. ही रॅली ते काम अतिशय चांगल्या पद्धतीने करणार आहे’.
रॅलीतील सर्व व्यवस्था एईव्हीपीएम महिला महाविद्यालय व हेडगेवार रुग्णालयातर्फे करण्यात आली. रॅलीच्या यशस्वीतेसाठी डॉ. मीनाक्षी मुलीयार, विनायक राऊत, डॉ. भरत सलामपुरे, अमृत बिऱ्हाडे, भिकन आंबे, मचिंद्र राठोड, सतीश पाटील, संजय महाजन, संदीप जगताप, प्रशांत जमधडे यांनी परिश्रम घेतले.

# लग्नाची वरात बैलगाडीत काढून समाजापुढे ठेवला नवीन आदर्श



आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** तालुक्यातील पार्डा दराडे येथील विवाहाची परिसरात जोरदार चर्चा होत आहे. सध्याच्या काळात आपण पाहत आहो की लग्नात हजारो रूपये खर्च करून गाड्याची स्पर्धा दिसत आहे. घोडा बॅन्ड बाजासह हजारो लाखो रूपये खर्च केल्या जात आहे.पण पार्डा दराडे येथील उद्धवराव नारायणराव दराडे यांचे चिरंजीव बालुप्रसाद व गावातीलच गणेश महादराव जायभाये यांची कन्या विद्या यांचा विवाह दि. 20/5/2022 रोजी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. नवरदेवाची वरात ही जुन्या रुढी परंपरेनुसार बैल गाडी सजवून गाडीमध्ये काढण्यात आली यामुळे या विवाहाची जोरदार चर्चा होत आहे. यामध्ये नवरदेवाकडील मंडळीने समाजामध्ये नवीन आदर्श निर्माण केला. शेतकरी हा वर्षभर आपली शेती बैलांवर करतो. वर्षभर ते बैल आपल्या मालकाला आपल्या कामातून आपली ताकद दाखवतात. त्या बैलाला मान फक्त पोळा या सनालाच असतो, पण हा शेतकरी पुत्र चिरंजीव बालू प्रसाद यांनी आपल्या विवाहाला आपली वरात आपल्या लाडक्या बैलांना सजवून गाडीमध्ये काढली. यामुळे या शेतकरी पुत्राच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. या विवाह सोहळ्यासाठी मेहकर मतदारसंघाचे आमदार डॉ. संजय रायमूलकर, सिंदखेडराजा मतदारसंघाचे माजी आमदार तोतारामजी कायंदे, खासदार प्रतापराव जाधव यांचे बंधू माधवराव जाधव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापतीप्रा. बळीराम मापारी, बुलढाणा शिवसेना जिल्हा प्रमुख नंदुभाऊ मापारी, शिवशत्र मित्रमंडळ लोणारचे अध्यक्ष सचिन बुधवत, शिवसेना बुथ प्रमुख खुरमपुर व तालुक्यातील ईतर आजी माझी पदाधिकारी, पाहुणे मंडळी, मित्र मंडळी उपस्थित होते. या सर्व विवाह सोहळ्याचे नियोजन समस्त दराडे परिवार व समस्त गावकरी मंडळी रामकिसन दराडे अध्यक्ष संगणक परिचालक संघटना लोणार यांनी केले.

# पाण्यासाठी राष्ट्रवादीचे घागर फोडो आंदोलन



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील जलसाठ्यामध्ये मूबलक प्रमाणात पाणी असतानादेखील मनपा अधिकारी व सत्ताधारी भाजपाच्या नियोजनशून्य कारभाराच्या निषेधार्थ धुळ्यात राष्ट्रवादी काँग्रेसने धुळेकरांना नियमित पाणीपुरवठा व्हावा यासाठी शहरातील झान्सी रानी पुतळा ते महानगरपालिका दरम्यान घागर मोर्चा काढत मनपाच्या प्रवेशद्वारावर घागर फोडत आंदोलन केले आहे.
तसेच सत्ताधारी भाजपा व मनपा अधिकारी यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने देखील करण्यात आली.
शहरातील विस्कळीत झालेल्या पाणीपुरवठा मनपाच्या अधिकाऱ्यांनी सुरळीत न केल्यास अधिकाऱ्यांना दालनात बसू न देण्याचा इशारा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष रंजीत भोसले यांनी मनपाला दिला आहे. निवडणुकीच्या काळात धुळेकरांना रोज पाणी देणार असं म्हणणारे जामनेरचे गिरीश महाजन गेले कुठे? असा संतप्त सवाल देखील राष्ट्रवादीने भाजपाला विचारला आहे.
राष्ट्रवादीने मोर्चा काढत अतिरिक्त आयुक्तांना पाण्यासाठी घेराव घालून चांगला जाब विचारला आहे. शहरातील पाणी प्रश्न दिवसेंदिवस चांगलाच पेटत चालला आहे. शहरातील नागरिकांना 10 ते 12 दिवसांनी होणारा पाणीपुरवठा त्यामुळे त्यांचे पाण्यावाचून होणारे हाल लक्षात घेता शहरातील सर्वच राजकीय पक्षांनी भाजपच्या विरोधात आंदोलने केली आहेत. मनपाला पाण्याचे नियोजन करण्यात अपयश आल्याचे दिसून येत आहेत. धुळेकरांना नियमित पाणीपुरवठा व्हावा अन्यथा यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादीने मनपा प्रशासन व सत्ताधारी भाजपा ला दिला आहे. याप्रसंगी राष्ट्रवादीचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची संख्याही लक्षणीय यावेळी दिसून आली.



# सामाजिक सलोखा राखण्यासाठीच ईद मिलन उपक्रम

## विश्वास आरोटे यांचे प्रतिपादन : शिर्डी येथे पत्रकार संघाचा ईद मिलन कार्यक्रम उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** समाजाचा पत्रकारांवर विश्वास असल्याने ईद मिलनच्या माध्यमातून हिंदू-मुस्लिम समाजात सामाजिक सलोखा राखण्यासाठी पत्रकार संघाचा हा उपक्रम आहे, असे मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांनी व्यक्त केले.

शिर्डी येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात शिर्डी पोलीस निरीक्षक गुलाबराव पाटील, ठाणे जिल्हाध्यक्ष अध्यक्ष भगवान चंदे, नगर जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, राहाता तालुकाध्यक्ष राजकुमार जाधव, अकोले तालुकाध्यक्ष अशोकराव उगले, जामखेड येथील जेष्ठ पत्रकार फारुक सय्यद, संजय वरभोग, मौलाना मन्सुर अली सैय्यद, जामा मस्जीद ट्रस्टचे मा. अध्यक्ष नसिरभाई दारुवाले, ट्रस्टी रज्जकभाई शेख, सलिमभाई शेख, अमिरभाई शेख, साई अनाथालयाचे गणेश दळवी, गफ्फारभाई पठाण, शब्बीरभाई सैय्यद, समिर शेख, आझाद ग्रुप अध्यक्ष शफीकभाई शेख, आजीम शेख, ओंकार शिंदे, नदीम शेख, इर्शाद इनामदार, हसन पठाण, फरियाद शेख, डॉ वसीम सैय्यद, जावेद शहा, गोविंद कोते, आयुभ इनामदार, पत्रकार अनिल भांबारे, कैलास विखे, रामभाऊ पिंगळे, अविनाश लिहिणार, सायरा सैय्यद यांच्या उपस्थितीत ईद मिलन कार्यक्रम झाला.

आरोटे म्हणाले, सामाजिक सलोखा आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची जबाबदारी समाजातील सर्वच घटकांची आहे. राजकारण लोकांच्या हिताचे आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाचे असावे. धार्मिक तेढ निर्माण करणारे असू नये. सामाजिक सलोखा बिघडू पहाणाऱ्या प्रवृत्तींना आता प्रसारमाध्यमांनीच बाजूला करणे आवश्यक आहे. सर्व जाती धर्माचे लोक गुण्या गोविंदाने वर्षानुवर्ष राहत आहेत. एकमेकांच्या सुख दुःखात, उत्सवात सहभागी होण्याची परंपरा आहे. त्यामुळे वर्षानुवर्ष चालत आलेल्या परंपरा, भाईचारा टिकवण्यासाठी पत्रकारांनी पुढाकार घ्यावा.



शिर्डीचे पोलीस निरीक्षक गुलाबराव पाटील यांनी सबका मलिक असणाऱ्या साईबाबांच्या नगरीत कोणत्याही धर्माचे नाहीतर साईबाबांच्या विचाराने लोक राहतात. संपूर्ण देशात भोंग्यावरून राजकारण सुरू असताना शिर्डीतील मुस्लीम समाज पहाटेची नमाज आम्ही बिगर भोंग्याची म्हणू, पण साईबाबांच्या काकड आरतीला मात्र भोंगे असावे ही मागणी केली. हा खरा साईबाबाचां संदेश येथे दिसून आला. विद्यमान सामाजिक परिस्थितीत समाज प्रबोधनाची गरज लक्षात घेऊन पत्रकार संघाने राज्यभर ईद मिलनचा उपक्रम राबवला. राजकारणाला बाजूला ठेऊन समाजासाठी पत्रकारांना सोबत घेऊन काय करता येईल, यावर चर्चा होऊ लागली आहे. त्यामुळे पत्रकारांनीही आपल्या गावात सामाजिक सलोख्याचे उपक्रम राबविण्यावर भर द्यावा असेही पाटील म्हटले.

**या कार्यक्रमात शिर्डी शहरातील कु. मुस्कान पटेल या विद्यार्थिनीने महाविद्यालयीन परिक्षेत ९३ टक्के गुण प्राप्त करत मुस्लिम समाजातील मुलींसाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करून एक आदर्श निर्माण केल्याबद्दल सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.**

ठाणे जिल्हाध्यक्ष अध्यक्ष भगवान चंदे यांनी हिंदू मुस्लीम हे धर्म वेगळे असले तरी आपण भारतीय म्हणून एकच असून आपले रक्त एकच आहे. समाजातील काही वाईट प्रवृत्तीमुळे समाज बदनाम होतो. मुस्लिम समाजाने आपले मूल शिक्षणाचे प्रवाहात आणण्यासाठी काम करावे, पत्रकार संघाचे वतीने मदत करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमात शफीकभाई शेख, जावेद शहा यांची भाषणे झाली.

यावेळी गुणवंत विद्यार्थी तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीते साठी राहाता तालुका महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी यांनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन पत्रकार रामभाऊ पिंगळे यांनी केले.

# फेटरी येथे 'देशाचा पोशिंदा शेतकरी' पुतळ्याचे मंत्री केदार यांच्याहस्ते अनावरण

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** स्वातंत्र्य संग्रामात शेतकऱ्यांची महत्वपूर्ण भूमिका होती. देशभक्तीने प्रेरित होऊन अनेक शेतकऱ्यांनी स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला होता. त्यासोबत देशाला अन्न धान्याचा पुरवठा नियमित चालू ठेवला. कोरोना महामारीच्या काळात सर्व उद्योग व्यवसाय ठप्प झाले असतांना शेतकऱ्यांचा व्यवसाय नियमित होता. अशा शेतकऱ्यांच्या स्मरणार्थ हा पुतळा उभारण्यात आला आहे. असेच पुतळे राज्यातही उभारुन शेतकऱ्यांप्रती कृतज्ञतेची भावना निर्माण केली पाहिजे, असे प्रतिपादन पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी केले.

मंत्री सुनील केदार यांच्या प्रेरणेतून 'देशाचा पोशिंदा शेतकरी' हा पुतळा ग्रामपंचायत फेटरी येथे उभारण्यात आला. या पुतळ्याचे अनावरण आज त्यांनी केले, त्यावेळी ते बोलत होते. कृष्णा इंस्टीट्युट ऑफ मेडिकल सायंन्स, कराडचे कुलगुरु वेदप्रकाश मिश्रा या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते, तर जिल्हा परिषद अध्यक्ष रश्मी बर्वे, माजी मंत्री रमेश बंग, कृषी व पशुसंवर्धन सभापती तापेश्वर वैद्य, शिक्षण व अर्थ सभापती भारती पाटील, महिला व बालकल्याण सभापती उज्वला बोढारे, नागपूर (ग्रामीण) पंचायत समितीच्या सभापती रेखा वर्टी, जिल्हा परिषद सदस्य कुंदा राऊत, ममता धोपटे, दिनेश बंग, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अहमद शेख, पंचायत समिती सदस्य रुपाली मनोहर, प्रिती अखंड, सरपंच संजय कुंटे यावेळी उपस्थित होते.

देशाची आर्थिक घडी बसविण्यात शेतकऱ्यांची भूमिका महत्वपूर्ण आहे. शेतकऱ्यांनी कष्टाने हा देश उभा केला आहे. या कृषी प्रधान देशात शेतकऱ्यांना मानाचे स्थान मिळावे हा यामागचा उद्देश असल्याचे केदार म्हणाले, सुनील केदार यांच्या प्रेरणेतून उभारण्यात आलेला शेतकरी पुतळा राज्यातील पहिला प्रयोग असावा, असे कृष्णा इंस्टीट्युट ऑफ मेडिकल सायन्स, कराडचे कुलगुरु वेदप्रकाश मिश्रा यांनी सांगितले. कष्टकरी व सेवाभावी शेतकऱ्यांचा पुतळा येथे उभारण्यात आला. याबाबत शेतकरी वर्गात अभिमानाची बाब असून एक नवचैतन्य त्यांच्यात निर्माण झाले आहे, असेही त्यांनी सांगितले.



1971 च्या लढ्यात माजी पंतप्रधान स्व. लालबहादूर शास्त्री यांनी 'जय जवान जय किसान' चा नारा देवून देशभक्तीची भावना देशवासियांच्या मनात रुजविली होती, त्यांचे स्मरण यावेळी होत असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक उन्नतीची वाट मिळून प्रेरणा मिळेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. जिल्हा परिषद सदस्य कुंदा राऊत व मान्यवरांनी यावेळी विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक फेटरीचे सरपंच धनश्री ढोमणे यांनी केले. या कार्यक्रमास परिसरातील सरपंच, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# समर्पित आयोगाला कासार समाजाकडून निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** महाराष्ट्र राज्यातील ओबीसींना स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय आरक्षण पुन्हा लागू करण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे, राज्य सरकारने गठीत केलेल्या समर्पित आयोगाला, महाराष्ट्र राज्यातील कासार समाजाच्यावतीने रविवारी (२२ मे) औरंगाबाद येथे निवेदन सादर करण्यात आले.

**ओबीसी आरक्षणाचे केले समर्थन**

आयोगाच्या औरंगाबाद येथील दौऱ्यादरम्यान विभागीय कार्यालयात, सकाळी साडेनऊ ते साडेअकरा दरम्यान जनसुनावणी झाली. या वेळी आयोगाचे प्रमुख बांठिया व सदस्यांनी कासार समाजाचे म्हणणे जाणून घेत, निवेदन स्वीकारले. अखिल भारतीय सोमवंशी क्षत्रिय कासार समाजोन्नती मंडळाचे अध्यक्ष शरद भांडेकर, अरुण वेळापुरे, गोविंद अंधारे, ॲड. योगेश अक्कर, प्रा.पुरुषोत्तम शिनगारे व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कासार समाजास मिळालेल्या प्रतिनिधीत्वाचे प्रमाण अत्यल्प आहे. योग्य व प्रमाणशीर प्रतिनिधीत्व मिळण्यासाठी आरक्षण पूर्ववत होणे आवश्यक आहे.

कासार समाजाचे विधी मंडळ व संसदेमध्ये प्रतिनिधीत्व नाही. त्यामुळे समाजाचे प्रश्न सुटत नाहीत. म्हणूनच कासार समाजाला योग्य लाभ मिळण्यासाठी ओबीसी राजकीय आरक्षणाची आवश्यकता आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

# जीवन प्रकाश योजनेत ५०० रुपयांत वीजजोडणी अनुसूचित जाती-जमातीसाठी सुवर्णसंधी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अर्जदारांना प्राधान्याने घरगुती वीज जोडणी उपलब्ध करून देण्यासाठी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजनेत धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील २४६ ग्राहकांना वीजजोडणी देण्यात आली आहे. ६ डिसेंबर २०२२ पर्यंत या योजनेचा लाभ घेता येणार असून गरजू नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता कैलास हुमणे यांनी केले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करण्याच्या दृष्टीने वीज जोडणी कार्यक्रम १४ एप्रिल २०२१ पासून सुरू करण्यात आला. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या मार्गदर्शनाखाली या योजनेची प्राधान्याने अंमलबजावणी सुरू आहे. या योजनेत आजपर्यंत धुळे जिल्ह्यात १३१ तर नंदुरबार जिल्ह्यात ११५ ग्राहकांना वीजजोडण्या देण्यात आलेल्या आहेत. असा घेता येईल लाभ योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अर्जदाराकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र वीज जोडणीसाठी करण्यात येणाऱ्या विहित नमुन्यानुसार आवश्यक कागदपत्रे उदा. आधार कार्ड, रहिवासी दाखला इ. आवश्यक आहे. तसे च अर्जदारांनी वीजजोडणीसाठी अर्ज केल्याच्या ठिकाणी यापूर्वीची थकबाकी नसावी योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराने महावितरणच्या विहित नमुन्यात कागदपत्रासह ऑनलाइन अथवा ऑफलाइन अर्ज करणे आवश्यक राहील. शासनमान्य विद्युत कंत्राटदारांकडून वीज मांडणीचा चाचणी अहवाल अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. लाभार्थ्यास ५०० रुपये इतकी अनामत रक्कम महावितरणकडे एक रकमी जमा करण्याचा अथवा सदर रक्कम ५ समान मासिक हफ्त्यांमध्ये वीजबिलाद्वारे भरण्याचा पर्याय उपलब्ध आहे. अर्जदाराचा परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या तरतुदीच्या अधीन राहून वीजजोडणी उपलब्ध करण्यात येईल.

महावितरणद्वारे प्राप्त अर्जानुसार ज्या अर्जदाराच्या घरी वीज जोडणी नाही अशा लाभार्थ्यांना विद्युत पायाभूत सुविधा उपलब्ध असल्यास पुढील १५ कार्यालयीन दिवसांत वीजजोडणी देण्यात येईल. अर्जदारास वीजजोडणीसाठी विद्युत पायाभूत सुविधा उपलब्ध करावी लागणार असल्यास महावितरणद्वारे स्वनिधी अथवा जिल्हा नियोजन विकास निधी अथवा इतर उपलब्ध होऊ शकणाऱ्या निधीमधून काम प्राधान्याने हाती घेऊन पूर्ण करण्यात येईल व वीजजोडणी देण्यात येईल.

DON'T NEGLECT YOUR HEALTH
HEALTH IS WEALTH
A TRUSTED SUPAR MARKET IN CITY

MAHAVIR
GHAR SANSAR
• Wholesale & Retail
• Kirana, Dry Fruits, Spices
• Crockery, Home Appliances
• Home Cleaning Material, Steel & Aluminium
• Plastic Items & Many More
Sumit 7620111118
Rajesh Jain 758834738
Ramesh Jain (Crockery) 9860481142 7620111117
Whatsapp Order & Any Order 9850017181
Delivery Status 9021395308 9657398232
Wholesale Enquiry 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. Road, Chelipura, Shahgunj, Aurangabad
Plot No. A25, Opp MIDC Police Station MIDC Chikalthana, Aurangabad

# अंकुरणाऱ्या भावी पिढीला घडविणाऱ्या शिल्पकारांचा सन्मान होणे योग्यच

## जीवन गौरव सन्मान बाबा भांड यांचे प्रतिपादन, ३० शिक्षक जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज




**औरंगाबाद :** शिक्षक ही केवळ व्यक्ती नसून संस्काराचे एक विद्यापीठ आहे. विद्यार्थी घडवून एक संवेदनशील नागरिक घडविणे व अशा नागरिकांच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मिती व मनुष्य निर्माणाचे कार्य करून शिक्षक हा खऱ्या अर्थाने सृजनाचा साधक आहे, असे प्रतिपादन राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार सोहळ्याचे अध्यक्ष बाबा भांड यांनी केले. प्रसिध्द बालगायक राज डोळस व सम्राट डोळस यांनी प्रेक्षकांची मने जिंकली.
बोधी ट्री एज्युकेशनल फाऊंडेशन व जीवन गौरव सार्वजनिक वाचनालयातर्फे रविवारी श्रीमती अश्विनी धाट उस्मानाबाद, गणेश कुंभारे भंडारा, महादेव हवालदार सांगली, बाळासाहेब निकाळजे औरंगाबाद यांच्यासह राज्यातील ३० शिक्षकांना व निबंध लेखन, नवोपक्रम स्पर्धेतील २० विजेत्या शिक्षकांना पुरस्काराने सम्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम रविवारी २२ मे रोजी शहरातील मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी सभाग्रहात औरंगाबाद येथे आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्यिक विचारवंत बाबा भांड होते. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे उद्‌घाटन संसद रत्न खासदार प्रोफेसर डॉ. सुनिल गायकवाड यांच्या हस्ते झाले. व्यासपीठावर प्रो. डॉ.वाल्मीक सरोदे, शिरीन वारे, अरुण सुरडकर, सुभाष मगरे, रामदास वाघमारे, संदीप सोनवणे, प्रा.भगवान विशे, संदीप ढाकणे, मीरा वाघमारे उपस्थित होते.
पुरस्कार सोहळ्याचे अध्यक्ष प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत बाबा भांड पुढे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, जगात कुठेही गुरू आणि शिक्षकांचा आदर केला जातो, काहींना अपार प्रेम दिले जाते, तर काही शिक्षक हे आयुष्यावरच केवळ प्रभाव टाकत नाही तर त्यांच्या जीवनातही स्थित्यंतर घडवून आणतात. शिक्षक विदयार्थ्यांच्या आयुष्यात बदल घडवून आणण्यास आणि त्यांना आकार देण्यास सज्ज असतात. जी भावी स्वप्ने मुलांनी उराशी बाळगलेली असतात ती समजून घेत ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी शिक्षक प्रयत्नशील असतात. शिक्षकाचे काम हे मार्गदर्शक, समुपदेशकाचे किंवा दिशादर्शकाचे आहे. पुरस्कारार्थी प्रतिनिधी म्हणून डॉ. वंदना जाधव, प्रा.डॉ. सुनिल चव्हाण यांनी पुरस्कार वितरण सोहळ्याची व 'जीवन गौरव' मासिकाच्या वाटचालीची प्रशंसा केली. या मासिकाच्या प्रगतीसाठी आम्ही सर्व पुरस्कारार्थी सर्वतोपरी सहकार्य करत राहू. भविष्यात आम्ही कुठेही असू तथापि जीवन गौरवला हवे ते सहकार्य यापुढे आवर्जून करत राहू, अशी ग्वाही दिली. सकाळी पहिल्या सत्रात राज्यस्तरीय निबंध व नवोपक्रम स्पर्धेचे बक्षीस वितरण कमलेश बोर्डे, चंदेलसिंह बैस यांच्या हस्ते करण्यात आले. दुपारी दुसऱ्या सत्रात राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्काराने ३० शिक्षकांना सन्मानित करण्यात आले.
पुढे बाबा भांड म्हणाले, शिक्षकांनी स्वतः शिकण्याची तयारी ठेवली पाहिजे. इतरांना शिकवणाऱ्याने सतत शिकत राहायला हवे. त्याची शिकण्याची प्रक्रिया कधीही बंद पडू नये शिक्षकांनी आयुष्याच्या अंतापर्यंत विदयार्थी म्हणूनच जगायला हवे. त्यांनी शिकण्याची इच्छा कधीही मरू देता कामा नये. शाळेचा दर्जा हा शिक्षकाच्या दर्जावर अवलंबून असतो. शिक्षक हा नवी पिढी घडवतो. पुढे डॉ. खासदार गायकवाड म्हणाले की, या शिक्षकांना पिढी घडवताना अनेक चढउतारांना सामोरे जावे लागते. वैयक्तिक सुख दु:खापेक्षा अध्यापनसेवेशी एकनिष्ठ राहणाऱ्या या शिक्षकांना सन्मानित केले पाहिजे. त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारली पाहिजे, हे काम जीवन गौरव परिवार करत आहे याचा मला अभिमान आहे.
जीवन गौरव शिक्षक पुरस्काराचा स्वीकार करण्यासाठी राज्यभरातील शिक्षक एकत्रित आले. त्यांनी आपल्या माता - पिता, कुटुंबीयांना सोबत आणून पुरस्काराचा मान वाढविला शिक्षकांच्या या उत्साहाने मी भारावून गेलो आहे. शिक्षकांनी सोबत आणलेल्या ज्येष्ठांचा, वडीलधाऱ्यांचा सन्मान राखण्याची भूमिका कायम ठेवली तर या पुरस्काराची सार्थकता खऱ्या अर्थाने वाढेल, असे प्रतिपादन पुरस्कार सोहळ्याचे उद्‌घाटक माजी खा.डॉ. सुनिल गायकवाड यांनी केले. सुत्रसंचलनकार प्रा.भगवान विशे यांनी शाहू फुले आंबेडकर यांचा इतिहास संचलनात उलगडला.
या पुरस्कार सोहळ्याचे प्रा.भगवान विशे, संदीप ढाकणे यांनी सूत्रसंचालन केले. आभार महादेव हवालदार, हनुमंत पडवळ यांनी मांडले.या सोहळ्यास फाऊंडेशनच्या सचिव मीरा वाघमारे, अन्सीराम वाघमारे, प्रेम सपाटे, ऋत्विक वाघमारे, प्रेरणा अजादे, प्रणाली उघडे, अमर सपाटे, गौरव वाघमारे, दिपक वाघमारे, संदीप अझादे, नीलेश उघडे, कैलास वाहूळ, संजय हिंगोलीकर, कल्याण अन्नपूर्ण, जगन्नाथ सुपेकर, अरुण सुरडकर व राज्यभरातील जीवन गौरवच्या टिमने सहकार्य केले आहे.

# बांठिया आयोगाचा वेळकाढूपणा सुरूच, तो उपक्रम त्वरित रद्द करा : आ.चंद्रशेखर बावनकुळे

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी महिन्याभरात ओबीसींचा इम्पेरिकल डेटा जमा होऊ शकतो. असे विधीमंडळात सांगितले होते. अधिवेशन उलटून दोन महिने झालेत तरीही डेटा अद्याप तयार झालेला नाही. हा डेटा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तयार होणे अपेक्षित असताना राज्याच्या ओबीसी आयोगाकडून भलतेच उपक्रम राबवून वेळकाढूपणा सुरू असल्याची संतप्त प्रतिक्रिया माजी मंत्री, ओबीसी नेते आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.
ओबीसी समाजाचा इम्पेरिकलडेटा जमविणाऱ्या बांठिया आयोगाने अहमदनगर जिल्ह्यात जाहीर केलेल्या कार्यक्रमाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करताना आ. चंद्रशेखर बावनकुळे पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, महाराष्ट्रातल्या ओबीसी आयोगाने मध्यप्रदेशच्या धर्तीवर डेटा जमविणे अपेक्षित आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायती आणि शहरातील महानगर पालिका, नगर पालिकांमधील मतदार यादी व कर यादीतील ओबीसींची संपूर्ण माहिती मिळवून इम्पेरिकल डेटा निर्माण होण्याची गरज आहे. परंतु तसे न करता बांठिया आयोग ओबीसी संघटनांची आणि नागरिकांच्या प्रतिक्रिया घेत राज्यभर फिरत आहे. ओबीसींच्या इम्पेरिकल डेटाला या उपक्रमाचा काहीही फायदा होणार नसल्याचे आ. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.
राज्यसरकारने सर्व शासकीय यंत्रणा कामाला लावली तर ओबीसींचाडेटा अवघ्या एक महिन्यात जमा होऊ शकतो. परंतु चालढकल करणाऱ्या ओबीसी आयोगाला सप्टेंबरपर्यंत डेटा जमाच होऊ द्यायचा नसल्याचे आ. बावनकुळे म्हणाले. राज्य सरकारमधील काही नेत्यांचा बांठिया आयोगावर दबाव आहे. सर्वोच्च न्यायालयाला अपेक्षित असलेला इम्पेरिकल डेटा तयारच होणार नाही यासाठी ते प्रयत्नशील असल्याचा आरोप आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी केला. म्हणूनच ओबीसी आयोग आधी लोकप्रतिनिधींची गोपनीय माहिती मागविते आणि आता सामान्यांच्या- संघटनांच्या प्रतिक्रिया मागवून वेळकाढूपणा करीत असल्याचे त्यांनी नमूद केले. सरकारने त्वरित सर्व शासकीय यंत्रणा कामाला लावून इम्पेरिकल डेटा जमविण्याची मागणी यावेळी आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

**पेट्रोल डिझेलचा वॅट कमी करावा**

पेट्रोलचे डिझेलचे दर कमी करून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी भारतीयांना दिलासा दिला असला तरी महाराष्ट्रात पेट्रोल डिझेलवर लावला जाणारा वॅट सर्वाधिक आहे. त्यामुळे किमान २० रुपयांचा वॅट कमी करून राज्याच्या जनतेला दिलासा देण्याची मागणी यावेळी आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.




# लयभारी साहित्य समूहतर्फे राज्यस्तरीय कविसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** लयभारी साहीत्य समूह सांगोला जि. सोलापूर तर्फे दि.22 रोजी एक दिवसीय राज्यस्तरीय कवीसंमेलन आयोजित करण्यात आले होते. पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर स्मृती भवन सांगोला येथे हे काव्य संमेलन संपन्न झाले. या प्रसंगी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक मान्यवर कवी उपस्थित होते.
कार्यक्रमाची सुरुवात औरंगाबाद येथील कवयित्री गायिका सुनिता कपाळे यांच्या स्वागत गीताचे झाली. प्रास्ताविक अनिल केंगार यांनी केले. स्वागताध्यक्ष कवी गझलकार विजय खाडे यांनी शाल स्मृती चिन्ह देऊन उपस्थितांचा व पाहुण्यांचा सत्कार केला. यावेळी आई, वडील, मुलगी, बहीण, भाऊ, पती-पत्नी, प्रेमी या नात्यांबरोबर अनेक विषयांवर दर्जेदार कविता सादर करण्यात आल्या.
याप्रसंगी सासू-सासरा हे पण हे आपल्या मुला-मुलींचे आई-वडील असतात तेव्हा त्यांचेवर देखील काव्य निर्मिती झाल्यास कौटुंबिक कलह कमी होण्यास निश्चित मदत होईल, असे विचार औरंगाबाद येथील कवी अ‍ॅड. सर्जेराव साळवे यांनी मांडले. तसेच युक्रेन युद्ध स्थितीमध्ये भारतातून शांतीसंदेश पाठवणारी जा कबुतर जा ही काव्य रचना सादर केली.
याप्रसंगी चिखली जि. बुलडाणा येथील जेष्ठ कविवर्य अ‍ॅड. विजयकुमार कस्तुरे, बबनराव महामुने, मनोहर पवार, इचलकरंजी येथील सुप्रसिद्ध कवयित्री सुवर्णाताई पवार, औरंगाबाद येथील कल्पना निंबोकार, सुनिता कपाळे, संगमनेर येथील दर्शन जोशी, कोल्हापूर येथील बाबा जाधव, सांगली येथील प्रा.अरुण कांबळे यांनी दर्जेदार कविता सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. सांगोला येथील सुप्रसिध्द कवयित्री बहिणाबाई यांनी सुंदर निसर्ग कविता सादर करुन संपूर्ण सभागृहाला मंत्रमुग्ध केले.

# भोकर शहरातील वाहतूक समस्या बनली नित्याचीच बाब

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरात प्रारंभीपासून दक्षिण भारताला जोडणारा रस्ता असल्याने वाहनांची गर्दी असते.आता राष्ट्रीय महामार्ग रस्ता म्हणून घोषित करण्यात आला आहे. दोन्ही बाजूंनी रस्ता रूंद करण्यात आल्याने वाहतूक समस्यावर तोडगा निघेल, अशी आशा होती पण आजही नागरिक व वाहनधारकांना जीव मुठीत धरून जावे लागते आहे. नागरिकांची होणारी हेळसांड दूर करण्यासाठी यावर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. संबंधित अधिकारी काय निर्णय घेतील याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.




भोकर शहर हे तेलंगणा सिमेलगत असून दक्षिण भारताला जोडणारा मुख्य रस्ता शहरातून जातो.वाहनाची होणारी गर्दी लक्षात घेऊन शासनाने उशिरा का होईना रस्त्याला राष्ट्रीय महामार्ग रस्ता म्हणून घोषित केले आहे. यामुळे रस्त्याचे भाग्य उजळले आहे. विविध अत्यावश्यक विकासात्मक कामे मार्गी लागले आहेत. जडवाहनांना शहरातून प्रवेश बंदी घालण्यात आली आहे. तरी बरीच वाहने नियम धाब्यावर बसवून शहरातून धूम ठोकतात. वाहतुक पोलीस मात्र केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. खरं तर नगरपालिका, महसूल विभाग, पोलीस, आरटीओ यांनी संयुक्तपणे बैठक घेऊन शहरातील वाहतूक व्यवस्थेला शिस्त लावणे गरजेचे आहे. याकडे संबंधित विभाग मात्र ढुंकूनही पाहत नाही. यामागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसल्याचे कळते. सुंदर शहर स्वच्छ शहर करण्यासाठी फारसे लक्ष दिले नाही पण रस्ता मोकळा श्वास घेण्यासाठी रुंदीकरण करण्यात आल्याने वाहतूक सुरळीत होईल अशी आशा होती. याच रस्त्यावर चारचाकी, दुचाकी, अवैध वाहतुकीची वाहने, अ‍ॅटोरिक्षा आणि व्यापारी आपल्या दुकानातील साहित्य बिनधास्त रस्त्यावर ठेवतात. रस्त्याच्या कडेला वाहनांसाठी स्वंतत्र पार्किंगची व्यवस्था करणे गरजेचे आहे. वाहतुकीची होणारी कोंडी लक्षात घेऊन शहरात उड्डाणपूल बांधण्यात आले आहे. रस्ता रूंद झाला पण वाहतूक समस्या आजही जैसे थे आहे. संबंधितांनी त्वरित लक्ष देऊन नागरिक व वाहनधारकांची होणारी गैरसोय दूर करावी, अशी त्रस्त झालेल्या जनतेची मागणी आहे. वरिष्ठ काय निर्णय घेतील याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in